# यवतमाळ सत्ता

*गुरूवार १५ ऑक्टोबर २०२६ | * अंक नं. १४५ | * किंमत ३ रुपये | * पाने ४ | * वर्ष ३ रे | RNI No.MAHMR/26/A3138


## क्राईम

### वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**घाटंजी :** तालुक्यातील माणोली शिवारात अज्ञात वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने दोघे जखमी झाल्याची घटना घडली. प्रशांत गुलाबराव भोयर यांच्या तक्रारीनुसार, त्यांचा मुलगा कार्तिक भोयर (वय २७) हा एमएच २९ एस १४१९ क्रमांकाच्या मोटारसायकलने जात असताना अज्ञात वाहनाने धडक दिली. या अपघातात कार्तिक भोयर आणि सुरेश पुंडलिकराव पुंडकर (वय ४५) जखमी झाले. अपघातानंतर वाहनचालक घटनास्थळावरून निघून गेल्याचे तक्रारीत नमूद आहे.

# डॉ.नीरज वाघमारे यांच्या अन्नत्याग आंदोलनाला यश

**किमान वेतनासाठी नगर परिषदेचे लेखी आश्वासन! १६ ऑक्टोबरपर्यंत वेतन जमा करण्याचे कंत्राटदारांना निर्देश पैसे न मिळाल्यास १९ ऑक्टोबरला नगर परिषद थेट कामगारांच्या खात्यात वेतन जमा करणार!**

• यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी





**यवतमाळ :** वंचित बहुजन आघाडीचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष तथा यवतमाळ नगर परिषदेचे गटनेते व नगरसेवक डॉ. नीरज वाघमारे यांनी कंत्राटी कामगारांना शासननिर्धारित किमान वेतन मिळावे, यासह विविध मागण्यांसाठी सोमवार, १२ ऑक्टोबरपासून नगर परिषदेच्या समोर सुरू केलेल्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाला यश आले आहे. नगर परिषद प्रशासनाने बुधवार, १४ ऑक्टोबर रोजी लेखी पत्र देत वेतनप्रश्नी कार्यवाहीचे आश्वासन दिले आहे.

नगर परिषद प्रशासनाने दिलेल्या लेखी पत्रानुसार, अग्निशमन विभागातील फायरमन व वाहनचालक, डाटा एन्ट्री ऑपरेटर आणि सुरक्षा रक्षक यांच्या सप्टेंबर २०२६ महिन्याच्या थकीत वेतनाबाबत संबंधित कंत्राटदारांना नोटीस देण्यात आली आहे. किमान वेतन कायद्यानुसार १६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत कामगारांच्या बँक खात्यात वेतन जमा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित कंत्राटदारांनी निर्धारित मुदतीत वेतन जमा न केल्यास १९ ऑक्टोबर २०२६ रोजी नगर परिषदेमार्फत थेट संबंधित कंत्राटी कामगारांच्या बँक खात्यात वेतन जमा करण्यात येईल, असे लेखी आश्वासन प्रशासनाने दिले आहे.

यापुढेही कंत्राटदारांनी शासननिर्धारित किमान वेतनानुसार वेतन अदा न केल्यास त्यांची पुढील देयके प्रलंबित ठेवणे, करारातील अटींनुसार एकतर्फी कारवाई करणे आणि काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

**■ सफाई कामगार व घंटागाडी कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबतही कार्यवाही**

नगर परिषद प्रशासनाने दिलेल्या पत्रानुसार, कंत्राटी सफाई कामगार, घंटागाडी वाहनचालक आणि मदतनीस यांच्या सप्टेंबर २०२६ च्या वेतनाबाबत सरकारी कामगार अधिकारी, यवतमाळ यांच्याकडे मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर संबंधित कंत्राटदारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन अदा करण्याचे सूचित करण्यात आले आहे. घनकचरा व्यवस्थापनाच्या नवीन अंदाजपत्रकात सफाई कामगार आणि चालकांच्या शासननिर्धारित किमान वेतनाचा समावेश करण्यात आला आहे. सध्या आचारसंहिता लागू असल्यामुळे नवीन निविदा प्रक्रिया राबविता येत नसून, आचारसंहिता संपल्यानंतर नवीन कंत्राटासाठी निविदा प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करण्याचे नियोजन आहे. सफाई कामगारांच्या किमान वेतनासंदर्भात सरकारी कामगार अधिकाऱ्यांमार्फत तपासणी करण्यात आली असून, संबंधित प्रकरणे न्यायालयात दाखल आहेत. न्यायालयाच्या निर्णयाचे तंतोतंत पालन करण्याचे आश्वासनही प्रशासनाने दिले आहे.

**■ डॉ. नीरज वाघमारे यांच्याकडून प्रशासनाचे आभार**

नगर परिषद प्रशासनाकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर डॉ. नीरज वाघमारे यांनी प्रशासनाचे आभार मानले. कंत्राटी कामगारांना शासननिर्धारित किमान वेतन मिळणे हा त्यांच्या हक्काचा प्रश्न असून, प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी यवतमाळ नगर परिषदेचे भाजपचे उपनगराध्यक्ष दत्ता कुलकर्णी, उपमुख्याधिकारी हरीश जाधव आणि आरोग्य विभाग प्रमुख अक्षय नवलकर तसेच नगरसेवक मीराताई वीर लोकेश इंगोले, नगरसेवक विपुल खोब्रागडे, पंढरी पाठे, अशोक कयापाक, अरविंद दिवे, प्रसन्नजित भवरे, शिवदास कांबळे, पुष्पा शिरसाठ, विलास वाघमारे, गजानन कोकाटे, अरविंद दिवे, यशोधरा कांबळे, ज्योती डेरे, सुनिता डेरे, मंदा डेरे, शोभना कोटंबे, पल्लवी कांबळे उपस्थित होते.

# एकवीरा दुर्गा उत्सव मंडळाच्या 'रामकुटी' देखाव्यात दुर्गामातेचे मनमोहक दर्शन

• यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी



**यवतमाळ :** एकवीरा दुर्गा उत्सव मंडळ, सरस्वती नगर, आरणी रोड, यवतमाळ यांच्या वतीने साकारण्यात आलेला 'रामकुटी' हा देखावा भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे. आकर्षक आणि कलात्मक पद्धतीने उभारण्यात आलेली सुंदर झोपडी तसेच झोपडीच्या आतील भागात विराजमान असलेली दुर्गामातेची मनमोहक मूर्ती भाविकांच्या भक्तिभावाला साद घालत आहे. देखाव्याची सुबक रचना, आकर्षक सजावट आणि दुर्गामातेच्या मूर्तीचे प्रसन्न स्वरूप यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. मंडळाने कल्पकतेने साकारलेल्या या देखाव्यातून धार्मिक श्रद्धा, कलात्मकता आणि भक्तीचा सुंदर संगम अनुभवायला मिळत आहे.

दुर्गामातेच्या दर्शनासाठी भाविकांनी या देखाव्याला अवश्य भेट द्यावी, असे आवाहन मंडळाच्या वतीने अध्यक्ष अनिल वाकचौरे, सचिव अनिल गायकवाड यांनी केले आहे.

# सुशील झोडगेकर यांना राष्ट्रपती पोलिस पदक

• यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी



**यवतमाळ :** विशेष उल्लेखनीय, दीर्घकालीन आणि निष्कलंक कामगिरीसाठी महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णूदेव वर्मा यांच्या हस्ते सुशील सुनीता सुरेश झोडगेकर यांना राष्ट्रपती पोलिस पदकाने सन्मानित करण्यात आले.

सेवानिवृत्त पोलिस उपनिरीक्षक सुशील झोडगेकर हे १९८८ मध्ये पोलिस शिपाई म्हणून महाराष्ट्र राज्य पोलिस दलात रुजू झाले होते. आपल्या एकूण ३६ वर्षांच्या कारकिर्दीत पदोन्नती होत ते २०२४ मध्ये पोलिस उपनिरीक्षक म्हणून निवृत्त झाले आहेत. विविध गुन्ह्यांच्या तपासामध्ये मधील वेळोवेळी उल्लेखनीय कामगिरी बजावणारे सुशील झोडगेकर यांना २०२१ मध्ये राज्याचे तत्कालीन पोलिस महासंचालक सुबोध जयस्वाल यांच्या हस्ते 'पोलिस महासंचालक सन्मानचिन्ह' देऊन गौरविण्यात आले आहे.

आपल्या दीर्घकालीन पोलिस सेवेत विविध सन्मान प्राप्त करणाऱ्या सुशील झोडगेकर यांचे वडीलही पोलिस सेवेत होते. विशेष उल्लेखनीय म्हणजे, १९८९ साली त्यांचे वडील सुरेश जगन्नाथ झोडगेकर यांनाही याच प्रतिष्ठित राष्ट्रपती पदकाने गौरविण्यात आले होते.

# ५००० रुपयांची अग्रिम मदत म्हणजे शेतकऱ्यांची क्रूर थट्टा

## मुख्यमंत्री साहेब, ५००० रुपयात दिवाळी होते का? ; शेतकरी नेते,प्रशांत सुरसकार

• यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी



**यवतमाळ:** अतिवृष्टी आणि अस्मानी संकटामुळे पूर्णपणे उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे लाजीरवाणे काम राज्य सरकारने केले आहे. सरकारने जाहीर केलेली ५००० रुपयांची अग्रिम मदत म्हणजे बळीराजाची शुद्ध क्रूर थट्टा असून, "मुख्यमंत्री साहेब, डोळे उघडून बघा! आजच्या या प्रचंड महागाईच्या काळात ५००० रुपयात दिवाळी साजरी होते का?" असा थेट आणि अत्यंत आक्रमक सवाल शेतकरी नेते प्रशांत सुरसकार यांनी केला आहे. यंदाच्या खरीप हंगामात सततच्या पावसाने शेतकऱ्यांचे पार कंबरडे मोडून टाकले आहे. सोयाबीन मातीमोल झाले, तर कापूसही हातचा गेला. तोंडचा घास हिरावला गेल्याने शेतकरी ढसाढसा रडत असताना, सरकार मात्र एसी केबिनमध्ये बसून ५ हजारांची तुटपुंजी भीक फेकत आहे. बळीराजाला भिकेची नाही, तर त्याच्या हक्काच्या मदतीची गरज आहे. सरकारने तात्काळ शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपयांची भरीव मदत दिलीच पाहिजे, अशी ठाम मागणी सुरसकार यांनी केली आहे. शेतकऱ्यांना आत्महत्येच्या खाईत ढकलू नका! यवतमाळ जिल्ह्यासह संपूर्ण वऱ्हाडात आज बाजारात गेल्यास तेल, डाळी आणि जीवनावश्यक वस्तूंचे भाव गगनाला भिडले आहेत. एकीकडे हजारो रुपयांचा शेती खर्च निघत नसताना ५ हजार रुपयात एका कुटुंबाचा सण कसा साजरा होणार? सरकारला शेतकऱ्यांच्या गरिबीची आणि हलाखीची गम्मत वाटते का? असा संतप्त सवाल करत, ही मदत म्हणजे शेतकऱ्यांना आत्महत्येच्या खाईत ढकलण्याचाच प्रकार आहे, असा तीव्र संताप सुरसकार यांनी व्यक्त केला. आरपारची लढाई लढणार; सरकारला थेट इशारा! आता शांत बसण्याचा काळ संपला आहे. सरकारने जर स्वतःची मस्ती बाजूला ठेवून त्वरित या निर्णयाचा पुनर्विचार केला नाही आणि शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली नाही, तर यवतमाळ जिल्ह्यात तीव्र आंदोलन छेडले जाईल. शेतकऱ्यांच्या या असंतोषाच्या वणव्यात सरकार खाक झाल्याशिवाय राहणार नाही, असा थेट आणि आक्रमक इशारा प्रशांत सुरसकार यांनी प्रशासनाला दिला आहे.

# कारंजा नगर परिषदेच्या दोन मुख्याध्यापकांसह तिघांचा अपघातात मृत्यू

## तपोवन फाट्याजवळ भीषण अपघात; कारंजा शहरात शोककळा

• यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी






**कारंजा (लाड) :** कारंजा नगर परिषद संचालित उर्दू प्राथमिक शाळा क्रमांक १ व २ चे दोन मुख्याध्यापक आणि बजाज पल्सर मोटारसायकलचा चालक अशा तिघांचा भीषण रस्ते अपघातात मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बुधवार, दि. १४ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास शेलूबाजारजवळील तपोवन फाट्यावर घडली. या घटनेमुळे कारंजा शहरातील शैक्षणिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

या अपघातात कारंजा नगर परिषद उर्दू प्राथमिक शाळा क्रमांक १ चे मुख्याध्यापक सैय्यद आबीद हुसैन सैय्यद रऊफ (वय ५६) आणि उर्दू प्राथमिक शाळा क्रमांक २ चे मुख्याध्यापक नाझीम मोहम्मद नूर मोहम्मद (वय ५७) यांच्यासह बजाज पल्सर मोटारसायकलच्या चालकाचा मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही मुख्याध्यापक शाळेच्या संचमान्यता कामानिमित्त कारंजा येथून वाशिम येथील प्राथमिक शिक्षण विभागाच्या कार्यालयाकडे मोटारसायकलने जात होते. दरम्यान, शेलूबाजारजवळील तपोवन फाट्यावर समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या बजाज पल्सर मोटारसायकलने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दोन्ही मुख्याध्यापकांसह पल्सर चालकाचाही मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

**■ लोकप्रतिनिधी, शिक्षकांची घटनास्थळी धाव**

अपघाताची माहिती मिळताच कारंजा नगर परिषदेचे गटनेते बिलाल पुंजानी, उपाध्यक्ष ॲड. फिरोज शेकुवाले, शिक्षण सभापती जाकीर शेख आणि नियोजन सभापती नदीम राज यांच्यासह मृतांच्या नातेवाइकांनी व शिक्षकांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघातानंतर पुढील कार्यवाहीसाठी तिघांनाही मंगरूळपीर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

दोन्ही मुख्याध्यापक हे कारंजा नगर परिषदेच्या शिक्षण विभागात कार्यरत असल्याने त्यांच्या निधनाच्या वृत्ताने शिक्षकवर्गात हळहळ व्यक्त होत आहे. शालेय कामानिमित्त प्रवास करत असताना घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे कारंजा नगर परिषद आणि शैक्षणिक क्षेत्रावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# निळोण्यातील वाघाई देवस्थानात नवरात्र उत्सव प्रारंभ

## डोंगर पायथ्याशी, निसर्गाच्या कुशीत स्थापित वाघामाय च्या दर्शनासाठी भक्तांची मांदियाळी

• यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी



**यवतमाळ :** शहरापासून दक्षिणेला गोधनी मार्गावरून पुढे गेल्यास निसर्ग सौंदर्याने नटलेल्या परिसरात डोंगरपायथ्याशी आई वाघाई चे मंदिर आहे. उजाड झालेल्या निळोणा गावातील वाघाई अनेक कुटुंबांची कुलस्वामिनी असून. भक्तांची वाघाई वर अतूट श्रद्धा आहे. त्यामुळंच नवरात्री उत्सवात वाघामायचा जागर होत असून. इथं नेहमीच भाविकांची ओढ असते. यवतमाळ शहरातून उगम पावलेली वाघाडी नदी नागमोडी वळण घेत वाघाई मंदिराशेजारून वाहते, वाघाई च्या नावावरून नामकरण झालेल्या वाघाडी नदीवर यवतमाळला पाणी पुरवठा करणारे निळोणा धरण असून, धरणाच्या काठावर आणि डोंगराच्या पायथ्याशी वाघाई वसली आहे. वाघामाय यवतमाळ वासीय भक्तांचे श्रद्धास्थान आहे. गोधनी ते बरबडा गावाच्या मधे सुमारे ४०० वर्षापूर्वीपासून वाघाईचे मंदिर आहे, ५० वर्षापूर्वी यवतमाळकरांच्या तृष्णातृप्तीसाठी निळोणा ची जमीन अधिग्रहित करून तेथे धरणाचे निर्माण झाले. गाव स्थलांतरीत झाले मात्र वाघाईचे तेथेच वास्तव्य आहे. देवीची सुंदर मूर्ती स्वयंभू आहे. अडीच फुट उंच असलेली आई ची मूर्ती लोभस असून तिला नित्यरोज साज श्रृंगार केला जातो. यवतमाळ पासून ७ किमी अंतरावर पूर्वी येथे निळोना हे गाव होते. ग्रामस्थांचे ग्रामदैवत असलेल्या वाघाई वर बरबडा, चौधरा, पांढरी, खरुला, गोधनी, जांब सह यवतमाळ शहर व नजीकच्या भक्तांची प्रचंड श्रद्धा आहे. पूर्वी हे मंदिर टेकडीवर होते मात्र भक्ताच्या तपश्चर्ये नंतर आई पायथ्याशी आली अशी मान्यता आहे. वाघाई ची मूर्ती अतिशय जागृत असल्याची भावना आहे. वाघामाय च्या गाभाऱ्या समोरच तिचे वाहन असलेल्या वाघांच्या मुर्त्या देखील आहेत. पूर्वीच्या काळात यवतमाळ वरून पाय वाटेने निळोना पर्यंत येता येत होते मात्र पुढे वाघाडी नदी असल्याने बरबडा चौधरा साठी कठीण मार्ग होता. घनदाट वृक्षांनी परिसर व्यापला होता. त्यातच डोंगर कपाऱ्या आल्याने वाघांचे येथे वास्तव्य होते. तरीही भक्त वाघामाय च्या दर्शनाला यायचे अनेकांना वाघ आडवा आला मात्र त्याने कुणालाही ईजा पोहोचविली नाही. हि वाघामाय चीच कृपा असे माणून भक्त येथे वाघाच्या प्रतिमा अर्पण करतात. मंदिरात नेहमीच आईचा जागर, व भंडारा आयोजित होत असतो. चैत्र व अश्विन नवरात्रीला मंदिरात उत्सव असतो.

वाघाई अनेकांचे कुलदैवत असल्याने भक्तांची नेहमीच येथे रेलचेल असते. निसर्गरम्य परिसर, गर्द हिरवळ असलेली वृक्षवल्ली, निळोना धरण यामुळे भरभरून निसर्गसौंदर्य लाभल्यानेही वाघाई मंदिरात मन रमतं. हा परिसर पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित असला तरी येथे कुठलेही विकास कार्य शासनाने हाती घेतलेले नाहि. भक्तोद्धारिणी देवी वाघामायवर भक्तांची श्रद्धा असल्याने येथे पर्यटन विकास साधावा अशी विश्वस्थांची मागणी आहे.

# खरीप पिकांसाठी बेंबळा धरणातून १५ ऑक्टोबरला पाणी सोडण्याची शक्यता

## पिक पेरणीचे नियोजन करावे ; पिण्याचे पाणी सुरक्षित ठेवण्यास सर्वोच्च प्राधान्य

• यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी



**यवतमाळ :** जलसंपदा विभागाच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनेनुसार, अल-निनोच्या प्रभावामुळे दि. ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत जिल्ह्यातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये म्हणून पिण्याचे पाणी सुरक्षित ठेवण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. बेंबळा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांकडून एका संरक्षाणात्मक आवर्तनाच्या मागणीनुसार खरिपाच्या पिकांसाठी बेंबळा धरणातून १५ ऑक्टोबर २०२६ ला पाणी सोडण्याची शक्यता आहे, अशी माहिती बेंबळा प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी केले आहे.

बेंबळा धरणात सध्या पिण्याचे पाणी व बाष्पीभवन वजा जाता सिंचनासाठी केवळ एक आवर्तन देता येईल इतका पाणीसाठा शिल्लक आहे. लाभक्षेत्रातील खरीप हंगामातील कापूस व तूर या पिकांचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांकडून एका संरक्षणात्मक आवर्तनाची अत्यंत तीव्र मागणी आहे. त्यानुसार हे पाणी सोडण्याची शक्यता आहे.

त्यामुळे, बेंबळा प्रकल्प विभागाच्या वतीने रब्बी हंगामासाठी पाणी देणे शक्य होणार नाही, याची बेंबळा धरणाच्या लाभक्षेत्रातील पाणी आवर्तनावर अवलंबुन असणा-या सर्व शेतकरी बांधवानी नोंद घ्यावी व त्यानुसार पिक पेरणीचे नियोजन करावे. गंभीर दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता प्रशासनास सहकार्य करावे आणि उपलब्ध पाण्याचा केवळ पिण्यासाठी व घरगुती वापरासाठी अत्यंत काटकसरीने वापर करावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# गुंतुनी गुंत्यात सा-या

संविधान आणि लोकशाही वाचविण्याचा कांगावा करत काँग्रेस आणि डाव्यांच्या पिलावळीने सध्या सुरू केलेल्या आंदोलनांच्या वादळाने देशात मोठा राजनैतिक, सामाजिक आणि सांस्कृतिक गुंता निर्माण झाला आहे. या गुंत्यामागील राजनैतिक डावपेचांचे निरीक्षण केले, तर या गुंत्याच्या गाठी कोठे बांधल्या जात आहेत आणि त्यामध्ये अधिक गुंतागुंत निर्माण करण्याचा प्रयत्न कसा केला जात आहे, हे ध्यानात येऊ शकते. मोदी सरकारच्या कारकीर्दीत हा गुंता अधिकच किचकट झाला आहे आणि विरोधी पक्षांनी व काही मूठभरांनी त्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावल्याचे काही दाखले उघडही झाले आहेत. युद्धस्थितीमुळे जेव्हा जगभरातील अनेक देशांत आर्थिक संकटे घोंघावत होती, तेव्हाही भारताची अर्थस्थिती स्थिर असताना अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताच्या अर्थव्यवस्थेचे वर्णन 'मृत अर्थव्यवस्था' असे केले आणि इकडे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी कोणताही विलंब न लावता ट्रम्प यांच्या त्या निराधार दाव्यास बळ देणारी वक्तव्ये सुरू केली, हे एक उदाहरण यासाठी पुरेसे ठरावे. अर्थात, ट्रम्प यांच्या त्या वक्तव्यामागील कारणे कालांतराने उघड होत गेली आणि भारतावर दबाव टाकण्याच्या अमेरिकेच्या अनेक प्रयत्नांना न जुमानता राष्ट्रहिताशी तडजोड न करण्याची कठोर भूमिका मोदी सरकारने राबविल्याने अशी आगपाखड होत असल्याचे उघड झाले होते. भारतातील विरोधी पक्षांचेही हेच दुखणे असावे. आता जनता सोबत नाही हे स्पष्ट झाल्यानंतर मोदी सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरून संविधान व लोकशाही वाचविण्याचा कांगावा करत सभ्य लोकशाहीचे संकेतच खुंटीवर टांगण्याचा अखेरचा आणि निकराचा प्रयत्न सुरू झाल्याने, या गुंत्यातून सद्य:स्थितीचे सलग चित्र शोधण्याचा प्रयत्न करायला हवा. एका बाजूला भारत पाचवी जागतिक अर्थव्यवस्था म्हणून उभा राहत आहे आणि त्याच काळात देशात सुरू असलेली आंदोलने, अमेरिकेतील राजकीय बदलांमुळे भारतीय उद्योगांवर येणारे निर्बंध, आंतरराष्ट्रीय अब्जाधीशांची वक्तव्ये, संयुक्त राष्ट्रांसारख्या जागतिक संस्थांची भारतासंबंधीची विधाने आणि देशांतर्गत विरोधकांकडून होणारे आरोप हे सारे धागेदोरे जोडल्यास एका व्यापक, गुंतागुंतीच्या आणि आक्रमक आंतरराष्ट्रीय पटाचे चित्र समोर उभे राहते. अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने पुनरागमन केल्यानंतर आणि एलन मस्क यांच्यासारख्या उद्योगपतींनी 'अमेरिका फर्स्ट' या धोरणाचा पुरस्कार अधिक आक्रमकपणे सुरू केल्यानंतर, त्याचा थेट फटका भारतीय आयटी क्षेत्राला बसलेला दिसतो. व्हिसा नियमांमधील संभाव्य बदल आणि आऊटसोर्सिंगवर लादले जाणारे निर्बंध हे केवळ अमेरिकेच्या देशांतर्गत रोजगाराचे धोरण असल्याचे भासविले जात असले, तरी भारताच्या सेवा क्षेत्राची कोंडी करण्याचा तो धोरणात्मक भाग आहे, यात शंका नाही. जागतिक महासत्तांच्या खेळात सहकार्यासोबतच स्पर्धाही तितकीच तीव्र असते. त्यामुळेच, मस्क यांचा तंत्रज्ञान आणि अवकाशातील वाढता प्रभाव आणि स्थानिक उद्योगांना संरक्षण देण्याचे अमेरिकेचे धोरण भारताच्या वाढत्या ताकदीला वेसण घालण्याचे अवजार म्हणून वापरले जात आहे का, हा प्रश्न अधोरेखित झाला आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणातील लढाया आजकाल केवळ आर्थिक निर्बंधांपुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. आता विमर्ष (नॅरेटिव्ह) आणि विचारसरणी (इझम) ही हत्यारेही प्रभावी ठरू लागली आहेत. हंगेरियन-अमेरिकन अब्जाधीश जॉर्ज सोरोस आणि त्यांच्या संस्थांच्या भूमिकेकडे या दृष्टीने पाहिले पाहिजे. सोरोस यांनी अनेकदा भारतातील विद्यमान राजकीय नेतृत्वावर आणि धोरणांवर उघडपणे टीका केली आहे. त्याच वेळी, संयुक्त राष्ट्रांच्या काही समित्यांकडून किंवा मानवाधिकार संघटनांकडून भारतातील अंतर्गत घडामोडींवर एकांगी किंवा घाईघाईने चिंता व्यक्त करणारी वक्तव्ये जारी केली जातात, हे या आंतरराष्ट्रीय समीकरणाचे दुसरे टोक आहे. जेव्हा भारतात एखादे आंदोलन उभे राहते किंवा धोरणात्मक निर्णय घेतला जातो, तेव्हा आंतरराष्ट्रीय स्तरावरून भारतातील लोकशाही धोक्यात असल्याचा सूर लावला जातो. 'देशांतर्गत बाबींमधील अनावश्यक आणि पूर्वग्रहदूषित हस्तक्षेप' म्हणून भारताकडून त्याचा वारंवार इन्कार केला जात असला, तरी भारताविरोधात जागतिक जनमत तयार करण्याचे हत्यार म्हणून अशा विमर्षांचा आधार घेतला जात असल्याचे वास्तव दुर्लक्षित करता येत नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावरील या घडामोडींचा थेट संबंध भारतातील देशांतर्गत राजकीय आणि सामाजिक वातावरणाशी जोडला जातो. अलिकडच्या काळातील परीक्षा घोटाळे, भरती प्रक्रियेतील घोटाळे, बेरोजगारी यांसारख्या समस्यांमुळे तरुणांमध्ये निर्माण झालेल्या असंतोषालाच हत्यार बनविले जात आहे. डिजिटल मोहिमांचा वापर करून आंदोलने फैलावत गेल्याने भारताविरोधात जागतिक नकारात्मकता निर्माण करण्याच्या प्रयत्नांना बळ मिळत आहे. या आंदोलनांना पाश्चिमात्य माध्यमांत भरभरून प्रसिद्धी दिली जाते, तेव्हा या आंदोलनांचे मूळ केवळ स्थानिक प्रश्नांत आहे की त्यामागे काही आंतरराष्ट्रीय पाठबळ आहे, असा साहजिक संशय राजकीय वर्तुळात निर्माण होतो. त्यामुळेच, राहुल गांधी किंवा दीपके यांच्यासारख्यांचा वापर भारतात अस्थिरता निर्माण करण्याच्या बाह्य शक्तींकडून केला जात असल्याच्या संशयास बळ मिळते.constitution and democracy 'भारतातील लोकशाही संस्था नष्ट होत आहेत आणि अमेरिका व युरोपने याकडे लक्ष दिले पाहिजे' अशा आशयाची विधाने काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी लंडन आणि अमेरिकेच्या दौऱ्यादरम्यान केली होती. केवळ राजकीय टीका म्हणून अशा वक्तव्यांकडे कानाडोळा करावा, की भारताच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करण्याचे उघड आमंत्रण म्हणून त्याकडे पाहावे, असा संभ्रमही त्यामुळेच वाढीस लागतो. भारतातील शेतकरी आंदोलन, नागरिकत्व सुधारणा कायद्याविरोधातील निदर्शने किंवा विद्यार्थ्यांचा उद्रेक अशा अनेक प्रसंगी परदेशातून एकाच वेळी सुरू होणाऱ्या हॅशटॅग मोहिमा, टूलकिट प्रकरणे आणि मानवाधिकार संघटनांचे अहवाल यांच्यातील अभूतपूर्व समन्वय हादेखील केवळ योगायोग ठरेल का, याचे नेमके उत्तरही या शोधातून सापडू शकते. त्यामुळेच, असे प्रकार म्हणजे बाह्य दबावापुढे न झुकणाऱ्या भारताला 'हायब्रिड वॉरफेअर'च्या जाळ्यात अडकवण्याचा प्रयत्न असल्याच्या संशयाला वाव मिळतो. रशिया-युक्रेन युद्ध, आंतरराष्ट्रीय व्यापारात भारतीय चलनाचा वापर, तेल खरेदीच्या निर्णयाचे स्वातंत्र्य, सीमेपलीकडील दहशतवादाविरोधातील कारवाया अशा काही मुद्द्यांवर भारत जेव्हा जेव्हा जागतिक पातळीवर एक स्वतंत्र आणि मजबूत भूमिका घेतो, तेव्हा तेव्हा भारतावरील आर्थिक व व्यापारी दबाव वाढविण्याचे प्रयत्न सुरू होतात असे दिसून आले आहे. बाह्य दबावापुढे भारत सहजासहजी झुकत नाही, हे दिसू लागले की, देशाला आतून कमकुवत करणाऱ्या कारवाया सुरू होतात. देशांतर्गत आंदोलनांना खतपाणी घालून, विरोधकांना हाताशी धरून आणि देशाची आंतरराष्ट्रीय प्रतिमा मलिन करून भारताची वाटाघाटी करण्याची ताकद कमी करण्याचा एक 'आंतरराष्ट्रीय खेळ' सध्या सुरू असल्याचे स्पष्ट चित्र यातून उमटू पाहत आहे. परराष्ट्र धोरणात आणि संयुक्त राष्ट्रातही रोखठोक भूमिका मांडणाऱ्या भारताच्या प्रभावाला शह देण्यासाठी 'देशांतर्गत अस्थिरता' हे हत्यार म्हणून वापरले जाऊ शकते. त्यामुळे, भारताचे वर्तमान एका आंतरराष्ट्रीय वळणावर उभे आहे. अंतर्गत स्थैर्य, भक्कम लोकशाही आणि तरुणाईचा विश्वास ही देशाची खरी ताकद आहे.



# शेतकऱ्यांच्या आशांना नवी पालवी

-पवन राठोड,
प्र.जिल्हा माहिती अधिकारी, यवतमाळ

निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती संकटात सापडली की त्याचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीला बसतो. यंदा अलनिनोच्या प्रभावामुळे पडलेला पावसाच्या खंड आणि पावसाअभावी पिकांचे नुकसान, उत्पादनातील घट आणि उत्पन्नाची अनिश्चितता यामुळे शेतकऱ्यांसमोर कर्जफेडीचे मोठे आव्हान उभे राहते. अशा कठीण परिस्थितीत राज्य शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी घेतलेला पीक कर्जवसुलीला स्थगिती आणि पीक कर्जाच्या पुनर्गठनाचा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणारा आहे. हा निर्णय अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा उभे राहण्यासाठी संधी देणारा आहे. या निर्णयाची थोडक्यात माहिती.....

मदत व पुनर्वसन विभागाने २५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार खरीप हंगाम २०२६ मध्ये ट्रिगर-१ अर्थात प्रथम कळ लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून विविध उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यात यवतमाळ जिल्ह्यातील १६ तालुक्यांचा समावेश आहे. याच अनुषंगाने सहकार विभागाशी संबंधित पीक कर्जाचे पुनर्गठन आणि शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या निर्णयामुळे बाधित तालुक्यांमधील शेतकऱ्यांना कर्जफेडीच्या तातडीच्या दबावातून काही प्रमाणात दिलासा मिळत आहे. विशेषतः खरीप हंगामातील पीक अपेक्षेप्रमाणे आले नाही किंवा उत्पन्न घटल्यामुळे विहित मुदतीत कर्जफेड करणे शक्य होत नसेल, तर अशा शेतकऱ्यांसाठी पीक कर्जाचे मध्यम मुदतीच्या कर्जात पुनर्गठन करण्याची तरतूद महत्त्वाची आहे. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक परिस्थिती सावरण्यासाठी अधिक नियोजनबद्ध पद्धतीने पुढे जाण्याची संधी मिळत आहे.

शासनाच्या निर्देशानुसार, बाधित तालुक्यांमधील सन २०२६-२७ च्या खरीप हंगामात घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची विहित मुदतीत परतफेड करू न शकणाऱ्या शेतकऱ्यांची संमती घेऊन कर्जाचे मध्यम मुदतीच्या कर्जात पुनर्गठन करण्यात येणार आहे.

ही प्रक्रिया ३० एप्रिल २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश बँकांना देण्यात आले आहेत. त्याचबरोबर संबंधित शेतकऱ्यांना पुढील खरीप हंगामासाठी पीक कर्ज उपलब्ध करून देण्याबाबतही स्पष्ट निर्देश आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची पत टिकवून ठेवण्यास आणि आगामी हंगामाच्या तयारीसाठी आवश्यक आर्थिक पाठबळ मिळविण्यास मदत होत आहे. शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती देण्याचा निर्णयही तितकाच महत्त्वाचा आहे. दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना कर्जवसुलीचा तगादा सहन करावा लागू नये आणि त्यांना शेतीच्या पुनर्नियोजनावर लक्ष केंद्रित करता यावे, हा या उपाययोजनांमागील महत्त्वाचा उद्देश आहे. या संपूर्ण प्रक्रियेत बँकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. या सवलतींचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी बँकांनी कार्यवाही सुरु केली आहे.

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे तसेच राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या समन्वयकांनी या शासन परिपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी होईल याची दक्षता घेण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. त्यामुळे संबंधित बँकांकडून पात्र शेतकऱ्यांना अनावश्यक अडचणी न आणता, निर्धारित मुदतीत कर्ज पुनर्गठनाची प्रक्रिया पूर्ण केली जात आहे.

जिल्हा प्रशासनानेही या निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीला प्राधान्य दिले असून जिल्हास्तरावर सातत्याने आढावा घेतला जात आहे. पीक कर्जाच्या पुनर्गठनासाठी बँकांकडून अडचणी निर्माण केल्या जात असल्यास किंवा कर्जवसुलीसाठी तगादा लावला जात असल्यास शेतकऱ्यांनी जिल्हा प्रशासनाकडे तक्रार करावी, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. यामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना आपली समस्या प्रशासनापर्यंत पोहोचविण्यासाठी एक महत्त्वाचा मार्ग उपलब्ध होत आहे.

शासनाने जाहीर केलेल्या सवलतींची अंमलबजावणीत तळागळापर्यंत आहे. बँकांनीही पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज पुनर्गठनाचे प्रस्ताव वेळेत निकाली काढणे, वसुली स्थगितीच्या निर्देशांचे पालन करणे आणि पुढील खरीप हंगामासाठी कर्ज उपलब्ध करून देणे, या बाबींना प्राधान्य दिले आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांनीही संबंधित बँकेशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रे व संमतीची प्रक्रिया पूर्ण करण्याची गरज आहे.

दुष्काळाचे संकट मोठे असले, तरी शेतकऱ्यांना उभारी देण्यासाठी त्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. शेतकऱ्यांना दुष्काळाची मदत दिवाळीपूर्वी देण्याचे नियोजन सुरु आहे. शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून सावरण्यासाठी पीक कर्ज पुनर्गठन, कर्ज वसुलीला स्थगिती आणि आगामी हंगामासाठी पीक कर्जाची उपलब्धता या उपाययोजना समन्वयाने राबविल्या जात आहेत. शासन, बँका आणि जिल्हा प्रशासन हे एकत्रितपणे या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करत असल्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना नव्या हंगामासाठी आर्थिक आधार देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. पीक कर्ज पुनर्गठन आणि कर्ज वसुलीला स्थगिती या निर्णयाने शेतकऱ्यांना नक्कीच दिलासा दिला आहे. संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना पुन्हा सक्षम करण्यासाठी अशा उपाययोजना निश्चितच महत्त्वपूर्ण ठरत आहेत. पीक कर्ज पुनर्गठन आणि कर्ज वसुलीला स्थगिती दिल्याने शेतकऱ्यांच्या आशांना नवी पालवी फुटली आहे.

# आता खरी कसोटी

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणावरून (एसआयआर) निवडणूक आयोग आणि विरोधकांमध्ये निर्माण झालेला संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्यासह 'इंडिया' आघाडीतील नेत्यांनी राजधानी दिल्लीत आंदोलन करत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. आयोगाच्या निर्णय प्रक्रियेतील अनियमितता, मतदारांची नावे वगळण्याची कार्यपद्धती आणि स्वतंत्र लेखापरीक्षणाची आवश्यकता यांसारखे मुद्दे त्यांनी उपस्थित केले. त्याआधीपासूनच हा मुद्दा न्यायप्रविष्ट आहे. याच कारणास्तव सरन्यायाधीशांनी राहुल आणि खर्गे यांच्या शिष्टमंडळाला भेट नाकारली. अशाप्रकारची चर्चा करणे ही न्यायिक नैतिकता आणि औचित्यानुसार नसल्याचे स्पष्ट करतानाच याचिका दाखल पुनरीक्षणाची आवश्यकता मान्य करतानाच त्यातील प्रक्रियात्मक दोष दूर केले गेलेच पाहिजेत. एसआयआर प्रक्रियेत घरोघरी पडताळणी, मसुदा मतदार यादीचे प्रकाशन, दावे व हरकती नोंदविण्याची संधी आणि अपिल करण्याची व्यवस्था आहे. सर्वोच्च न्यायालयानेही २७ मे रोजी पुनरीक्षणाचा वैधानिक अधिकार मान्य केला आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या काही निर्णयांबाबत निवडणूक आयुक्त सुखबीरसिंग संधू आणि विवेक जोशी यांनी दहा महिन्यांत १४ वेळा आक्षेप नोंदविल्याचे समोर आले. न्यायालयाने संबंधित याचिकांवर आयोग आणि केंद्र सरकारकडून उत्तर मागविले आहे. त्यावेळी मुख्य निवडणूक आयुक्तांना तात्पुरते पदावरून दूर करण्याची मागणी न्यायालयाने फेटाळली. निर्णय घेताना सदस्यांचे आक्षेप नोंदविले



करण्याचा सूचक सल्ला सूर्य कांत यांनी दिला होता. ही याचिका न्यायालयाच्या पटलावर तत्काळ आलीही असती; पण त्यात १४ त्रुटी असल्याचे समोर आले. काँग्रेसकडे निष्णात विधिज्ञ असताना इतक्या महत्त्वाच्या याचिकेत क्षुल्लक त्रुटी राहणे, ही बाब गंभीर आहे. दुसरीकडे केरळ काँग्रेसने सरन्यायाधीशांच्या राजीनाम्याची मागणी करणारी पोस्ट समाजमाध्यमांवर टाकली होती. सदर पोस्ट तत्काळ डिलिट केली असली, तरी यातून घटनात्मक संस्थांवर अविश्वास दाखवण्याची भूमिका समोर आली. कपिल सिब्बल यांनीही सर्वोच्च न्यायालयाकडून फारशा अपेक्षा राहिलेल्या नाहीत, कोर्टात जाण्याला काही अर्थ उरलेला नाही, असे विधान केले होते. निवडणूक आयोग, सर्वोच्च न्यायालय या स्वायत्त संस्थांच्या कार्यपद्धतीत उणिवा असू शकतात; पण अशी विधाने करून त्यांचे जनमानसातील आणि लोकशाहीतील स्थान डळमळीत करणे समर्थनीय नाही.

निवडणूक प्रक्रियेत अनियमितता, मतदार याद्यांमध्ये त्रुटी आणि एसआयआर प्रक्रियेवरून ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात दाखल केलेल्या सर्व याचिका एकत्र करून यावर २७ ऑक्टोबरला सुनावणी घेण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. न्यायालयीन प्रक्रियेचा आदर करत संयम राखणे ही विरोधी पक्षांची जबाबदारी आहे. विरोधकांच्या आरोपांची आता कायदेशीर कसोटी लागणार आहे. सरकारच्या दृष्टीनेही घटनात्मक संस्थांच्या कामावर निर्माण झालेल्या शंकांना वस्तुनिष्ठ उत्तरे मिळणे आवश्यक आहे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० आणि राज्यघटनेच्या कलम ३२४ अंतर्गत आयोगाला निवडणूक प्रक्रियेचे व्यवस्थापन करण्याची जबाबदारी दिली आहे. त्यानुसार देशातील मतदार याद्या अद्ययावत ठेवण्याचे काम सातत्याने चालते. मृत मतदारांची नावे, स्थलांतरामुळे निर्माण झालेल्या दुबार नोंदी आणि इतर अपात्र नोंदी यांची पडताळणी आयोगाकडून केली जाते. दुबार नोंदी कायम राहणे आणि पात्र मतदारांची नावे चुकीने वगळली जाणे, या दोन्ही त्रुटी निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेला बाधा आणतात. त्यामुळे गेले पाहिजेत आणि त्यावर नियमानुसार विचार झाला पाहिजे; मात्र मतभेदांची नोंद झाली म्हणून प्रत्येक निर्णय बेकायदेशीर ठरतो, असा निष्कर्ष काढता येत नाही. आयोगाने अलीकडेच सर्व बैठकींचे विषयपत्रक आधी वितरित करण्याचा आणि बैठकीचे इतिवृत्त तयार करण्याचा निर्णय जाहीर केला. आयटी प्रणालीच्या परीक्षणासाठी स्वतंत्र तज्ज्ञांचा समावेश असलेली समिती नेमण्याचीही तरतूद केली. संस्थात्मक कार्यपद्धतीतील अशा सुधारणा प्रत्यक्षात उतरल्यास निर्णय प्रक्रियेतील संदिग्धता कमी होऊ शकते; परंतु मतदार यादी पुनरीक्षणात पात्र नागरिकांची नावे वगळली जाण्याची शक्यता गांभीर्याने हाताळायला हवी. आयोगाने पुनरीक्षण झालेल्या राज्यांत वगळलेल्या पात्र मतदारांसाठी विशेष नोंदणी मोहीम राबविण्याचे निर्देश दिलेत. ही कार्यवाही योग्य दिशेने असली, तरी तिचे मूल्यमापन प्रत्यक्ष परिणामांवर करावे लागेल. किती अर्ज प्राप्त झाले, किती नावे पुन्हा समाविष्ट झाली, किती प्रकरणांत अपील दाखल झाले, याची माहिती सार्वजनिक व्हायला हवी. स्थलांतरित कामगार, बेघर नागरिक, वृद्ध आणि दस्तावेजांची उपलब्धता मर्यादित असलेल्या व्यक्तींना पुनरीक्षणात अडचणी येऊ शकतात. अशांसाठी विशेष मदत केंद्रे, घरोघरी संपर्क आणि सुलभ सुनावणीची व्यवस्था असणे महत्त्वाचे आहे. मतदारांची नावे वगळण्याच्या प्रत्येक घटनेमागे राजकीय हेतू असल्याचा आरोप करण्यासाठी ठोस पुरावे लागतील. त्या आधारेच विरोधी पक्षांना न्यायालयातील कायदेशीर लढाई जिंकता येईल. त्यामुळे आता आरोपांची तीव्रता वाढविण्यापेक्षा निर्णय प्रक्रियेतील त्रुटी न्यायालयासमोर सादर करण्याबाबत विरोधकांनी सक्रियता दाखवावी. विरोधी पक्षांच्या याचिकेत १० मागण्या असून त्यात मततदार यादीतून वगळलेल्या सर्व मतदारांची यादी मतदान केंद्रनिहाय (बूथनिहाय) सार्वजनिक करण्याचे आदेश आयोगाला देण्याची विनंती केली आहे. यात नाव वगळण्याचे नेमके कारण, लिंग आणि वयानुसार वर्गीकरण, तसेच पात्र मतदारांची नावे पुन्हा समाविष्ट करण्यासाठी एक कार्यक्षम यंत्रणा उपलब्ध करून देण्याचा समावेश आहे.

# मानव-प्राणी संघर्ष रोखता येईल ?



कोकणात मानव आणि वन्यप्राण्यांमधील संघर्ष दिवसेंदिवस तीव्र होत असून, हत्ती आणि बिबट्यांच्या वाढत्या वावरामुळे शेतकरी व नागरिकांसमोर नवे संकट उभे राहिले आहे. मागच्या वर्षी केरळमध्ये गर्भवती हत्तिणीचा फटाके असलेले अननस खाऊन मृत्यू झाला होता, तेव्हा माणूस आणि प्राणी संघर्षाच्या तीव्र वेदनांचा आलेख समोर आला. अशाच पद्धतीचे थोडे सौम्य वर्तन तिलारीच्या खोऱ्यात ओंकार हत्तीच्या बाबत झाल्याचे सांगितले जात आहे. कोकणात मानव आणि प्राणी संघर्ष तीव्र होताना दिसत आहे.

बिबट्याच्या हल्ल्यात माणसांचा मृत्यू होतो आहे. हत्ती-मानव संघर्ष वाढत आहे. जंगलतोडीमुळे हत्ती पारंपरिक भूप्रदेश सोडून इतर भागांत जातात. हेच या संघर्षाचे मूळ कारण आहे. हत्तींच्या मूळ प्रदेशाबाबत शास्त्रीय दृष्टिकोनातून जे अभ्यास झाले आणि त्यांच्या स्थलांतराचे निरीक्षण नोंदवले गेले, त्यामध्ये गेल्या दहा ते पंधरा वर्षांत हत्ती मूळ अधिवास सोडून मानव वस्तीनजीकच्या शेताकडे आकर्षित झाल्याचे दिसत आहे. महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये आलेले हत्ती कर्नाटकातील दांडेली या मूळ अधिवासातून स्थलांतरित झाले आहेत. पश्चिम घाटामध्ये खाणकाम आणि जलविद्युत प्रकल्पांमुळे जंगली प्राणी अन्नाच्या शोधार्थ स्थलांतरित होताना दिसत आहेत. हत्तीप्रवण तिलारी क्षेत्रात अलीकडेच वाघिणीने तीन पिल्लांना जन्म दिला. पट्टेरी वाघाव्यतिरिक्त बिबटे, ब्लॅक पँथर, रान कुत्री, रानमांजर, कोल्हा हे मांसभक्षी प्राणी असल्याने त्यांचे मुख्य अन्न सांबर, भेकर, गवे, रानडुक्कर, शेकरू, लोरीस, वानर, भेकरे हे असते. तिलारीच्या जंगलात हे प्राणी मोठ्या प्रमाणावर आहेत. हा भाग संरक्षित क्षेत्र म्हणून घोषित व्हावा म्हणून पर्यावरणवाद्यांची चळवळ आहे.

पिण्याच्या पाण्याचे विपुल स्रोत, जलविद्युत प्रकल्प औषधी वनस्पती आणि दुर्मीळ जंगली वृक्ष येथे आहेत. हत्ती या भागाकडे आकर्षित झाले. आता या स्थलांतरित झालेल्या पाहुण्यांचा त्रास शेतकऱ्यांना होऊ लागल्याने हा संघर्ष वाढत आहे. हत्तीग्रामसारखी संकल्पना राबवून हा संघर्ष काही प्रमाणात थांबवणे शक्य आहे. जंगलांमध्ये घाणेरी आणि रानमोडी या वनस्पतींच्या बेसुमार वाढीमुळे तृणभक्षी प्राण्यांचे नैसर्गिक अन्न कमी झाले आहे. त्यामुळे हत्ती हे मूळ जंगलातून मानवी वस्तीकडे स्थलांतरित झाले आहेत. जंगलांमध्ये चर मारणे, सौरऊर्जा कुंपण घालणे आणि हत्तींना पळवून लावण्यासाठी फटाके लावणे, असे प्रयत्न शासनस्तरावर झाले; पण या प्रयोगांचा फायदा मात्र काही झाला नाही.

हत्तींचे स्थलांतराचे मार्ग ठरलेले असतात. हत्ती हा बिनधास्त प्राणी असल्याने कुठच्या अडथळ्यांना न जुमानता तो पुढे जातो. मग, रस्त्यावर आलेल्या केळी बागायती, झाडे याची तो नासधूस करतो. त्यांच्या पारिवारिक जीवनाचा अभ्यास करून त्यांचे संवर्धन करणे शक्य आहे. अनेक देशांमध्ये हत्तीग्रामसारखी संकल्पना प्रत्ययरूपामध्ये आली आहे. याचा विचार आपल्या सरकारने मात्र केलेला नाही. म्हणूनच हा प्रश्न अधिक गंभीर रूप धारण करू लागला आहे. पश्चिम घाटात २५ वर्षांपूर्वी पामतेल, रबर, नीलगिरी, मांजीयम, ऑस्ट्रेलियन बाभूळ असे वृक्ष लावले गेले. यामुळे मूळ वृक्षांचा ऱ्हास झाला. कोकण पट्ट्यात रबर, पामतेल वनस्पतींची लागवड आजही मोठ्या प्रमाणात होत आहे.

हे परदेशी वृक्ष आणले गेले, हाही वन्यप्राण्यांच्या स्थलांतराचे एक कारण आहे. आपल्या जंगलांचे मूळ स्वरूप पुन्हा स्थापित करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना हाती घ्याव्या लागणार आहेत. त्यासाठी धोरणकर्ते आणि लोकप्रतिनिधी यांचा योग्य समन्वय आवश्यक आहे. हत्तींच्या अभ्यासासाठी दक्षिण कोकणात आता पर्यावरणवादी मंडळींनी पावले उचलली आहेत. हत्तींना योग्य प्रशिक्षण दिले, तर त्याचा सकारात्मक उपयोगही होऊ शकतो, याची उदाहरणे राजेरजवाड्यांच्या कालखंडापासून आहेत. हत्तींचे भटकंतींचे पट्टे असतात. एका भागातून हत्ती गेल्यानंतर दुसरा कळप येईपर्यंत वनसंपदा निसर्गचक्राने परत निर्माण होते; मात्र असे पट्टे परदेशी झाडांनी व्यापल्याने हे चक्रच बदलून गेले आहे. याबाबत आता योग्य पुनर्विचार करायला हवा आणि जंगलांचे मूळ स्वरूप पुन्हा आणण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. आजच्या संघर्षावर हा एक उपाय ठरू शकेल.

हे वृत्तपत्र, प्रसाद प्रिंटर्स अँड स्टेशनर्स, पोलीस मुख्यालयासमोर यवतमाळ येथे मुद्रित करून प्रकाशक, संपादक, प्रकाशक गणेश नारायणराव खडसे मो. नं.9822286143 यांनी दैनिक यवतमाळ सत्ता, आर्णी रोड, अशोक नगर, यवतमाळ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद यवतमाळ न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात.) (कार्यकारी संपादक वैभव यंशवतराव जगताप मो.नंबर 9921941000) **English:** This newspaper was printed by Ishwarshah Ratansinh Sengar at Prasad Printers and Stationers, opposite the Police Headquarters, Yavatmal, and published by the owner, editor, and publisher Ganesh Narayanrao Khade at "Dainik Yavatmal Satta", Arni Road, Ashok Nagar, Yavatmal (Maharashtra). (All disputes are subject to the jurisdiction of Yavatmal courts.)

# चंद्रपुरात प्रतिबंधित सुगंधी तंबाखूची वाहतूक उघड; दोघे पोलिसांच्या ताब्यात

## एलसीबीची धडक कारवाई; तंबाखू व मोटारसायकलसह १ लाख २३ हजार ३७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त

*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी

**■ चंद्रपूर : तेलंगणा राज्यातून विनापरवाना प्रतिबंधित सुगंधी तंबाखूची वाहतूक करणाऱ्या दोघांविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) कारवाई केली. या कारवाईत दोघांना ताब्यात घेण्यात आले असून, तंबाखू आणि वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या मोटारसायकलसह एकूण १ लाख २३ हजार ३७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई १३ ऑक्टोबर रोजी करण्यात आली.**



स्थानिक गुन्हे शाखेचे पथक चंद्रपूर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असताना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करण्यात आली. यावेळी साहिल मंगल वांढे (वय २४, रा. बिनबा गेट वार्ड, चंद्रपूर) आणि वसंत नागोजी नरड (वय ६०, रा. हनुमान वार्ड, चंद्रपूर) या दोघांना ताब्यात घेण्यात आले.

### पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

**■ पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी आणि अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात चंद्रपूर उपविभाग पथकाने ही कारवाई केली. प्रतिबंधित तंबाखूची अवैध वाहतूक आणि विक्रीविरोधात पोलिसांकडून करण्यात येणाऱ्या कारवायांच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणाकडे लक्ष वेधले जात आहे.**

तेलंगणातून आणलेला तंबाखू जप्त

पोलिसांनी आरोपींकडून हुक्का शिशा, ईगल हुक्का शिशा आदी प्रतिबंधित सुगंधी तंबाखू जप्त केला. हा तंबाखू तेलंगणा राज्यातून विनापरवाना आणल्याची माहिती पोलिसांनी दिली. तंबाखूच्या वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली हिरो कंपनीची एमएच ३४ एआर ९९०९ क्रमांकाची मोटारसायकलही जप्त करण्यात आली. या प्रकरणी चंद्रपूर शहर पोलीस ठाण्यात दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चंद्रपूर जिल्ह्यातील १३ बंद पाणीपुरवठा योजना सुरू होण्याची आशा

## थकीत वीजबिल माफीबाबत शासनाचे आश्वासन; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन; मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्याशी आ. सुधीर मुनगंटीवार यांची दूरध्वनीवरून चर्चा

*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी

**■ चंद्रपूर : थकीत वीजबिलांमुळे बंद पडलेल्या चंद्रपूर जिल्ह्यातील १३ प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पुन्हा सुरू होण्याची आशा निर्माण झाली आहे. या योजनांची थकीत वीजबिले माफ करण्याबाबत शासन सकारात्मक असून, यासंदर्भात मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी आश्वासन दिल्याची माहिती आहे. आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी केली आहे.**



जिल्ह्यात जिल्हा परिषद व शिखर समितीमार्फत एकूण ३३ प्रादेशिक पाणीपुरवठा योजना चालविल्या जातात. त्यापैकी २० योजनांद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे, तर सुमारे ४ कोटी ९२ लाख ६८ हजार रुपयांची वीजदेयके थकीत असल्यामुळे १३ योजना बंद आहेत. परिणामी, सुमारे १९० गावांतील १ लाख ७५ हजार नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. दुष्काळसदृश परिस्थितीत ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागू नये, यासाठी थकीत वीजदेयके दुष्काळ निवारण किंवा पाणीटंचाई निधीतून अदा करण्याची मागणी मुनगंटीवार यांनी केली आहे. सन २०१८ मधील दुष्काळी परिस्थितीतही ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजनांची वीजदेयके टंचाई निधीतून भरण्याबाबत शासनाने निर्देश दिले होते. त्याच धर्तीवर सध्याच्या परिस्थितीतही निर्णय घेऊन बंद योजना पुन्हा सुरू कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. या प्रश्नावर मुनगंटीवार यांनी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. चर्चेदरम्यान थकीत वीजबिल माफीबाबत सकारात्मक आश्वासन मिळाल्याचे सांगण्यात आले. मात्र, या आश्वासनाची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि योजनांचा वीजपुरवठा पूर्ववत होण्यासाठी शासनाच्या अधिकृत निर्णयाची प्रतीक्षा आहे.

पिण्याचे पाणी ही नागरिकांची मूलभूत गरज असल्याने थकीत वीजबिलांमुळे ग्रामीण जनतेला पाण्यापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी हा प्रश्न शासनदरबारी उपस्थित करण्यात आला आहे. आता शासनाकडून वीजबिल माफीबाबत निर्णय होऊन १३ बंद पाणीपुरवठा योजना सुरू होतात का, याकडे जिल्ह्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# सेवा संकल्प पंधरवड्यातून जलसंधारणाला चालना

*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी

**घाटंजी** : पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून त्याचा जमिनीत अधिकाधिक जलसंचयासाठी उपयोग व्हावा, तसेच पशुपक्ष्यांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने सेवा संकल्प पंधरवड्यांतर्गत घोटी मंडळातील शारी (घोटी) येथील नाल्यावर दोन वनराई बंधारे उभारण्यात आले. 'लोक जल सप्ताह अभियान' अंतर्गत 'एक एक बंधारा, शाश्वत जलधारा' हा उपक्रम राबवून महसूल आणि कृषी विभागाने जलसंधारणाच्या कामाला सुरुवात केली. यावेळी उपविभागीय अधिकारी महेश येलगट्टे, तहसीलदार विजय साळवे, निवासी नायब तहसीलदार प्रफुल्ल घोडे आणि तालुका कृषी अधिकारी रंजना बोबडे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. महसूल विभाग आणि कृषी विभागाने प्रत्येकी एक वनराई बंधारा तयार केला. दोन्ही विभागांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतल्याने जलसंधारणाच्या उपक्रमाला सुरुवात झाली.

# •घटना-घडामोडी

## बोरगावात दष्काळसदृश स्थितीबाबत ग्रामसभा

कुऱ्हा (तळणी) : आँर्णी तालुक्यातील बोरगाव पुंजी येथे पाणीटंचाई यासंदर्भात ग्रामसभा झाली. यावेळी गावातील पिण्याच्या पाण्याचे स्रोत सुरक्षित ठेवणे, नदीवरील मोटार त्वरित काढून घ्यावे, नवीन विहीर व बोअर खोदकाम करू नये, चाराबंदी, विहिरी व बोअरवेल अधिग्रहणाचे नियोजन आणि पाणीटंचाईचा त्रास होऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यावर चर्चा करण्यात आली. तसेच जलस्रोतांमधून पाणी उपसा करण्यावर निर्बंध लागू करणे, पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे संरक्षण करणे आणि पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी उपाययोजना करणे. यावर चर्चा करण्यात आली.यावेळी ग्राममहसूल अधिकारी सुनील राठोड, सहाय्यक कृषी अधिकारी डी. एन. कासीदकर, उत्तम राठोड, शंकर राऊत यांच्यासह गावकरी उपस्थित होते.

## खो-खो स्पर्धेतील मुलींची निवड

**पुसद** : क्रीडा संचालनालय, पुणे व यवतमाळ जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या सहकार्याने आयोजित तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत येथील श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या १९ वर्षांखालील मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक पटकाविल्याने संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. क्रीडा शिक्षक महिमा राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्य, चपळता आणि सांघिक समन्वयाच्या जोरावर हे यश संपादन केले. तालुकास्तरावर मिळविलेल्या या विजयामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या सचिव अश्विनी अनिरुद्ध पाटील चोंढीकर यांनी विजयी संघासह क्रीडा शिक्षक महिमा राठोड यांचे अभिनंदन केले. तसेच प्राचार्य दत्तात्रय जीवने, उपप्राचार्य प्रज्ञा गडदे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे कौतुक करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## भदंत बुद्धघोष महाथेरो; धम्मदेसना कार्यक्रम

**घाटंजी** : धम्म ही केवळ धार्मिक शिकवण नसून जीवन जगण्याची कला आहे, असे प्रतिपादन भदंत बुद्धघोष महाथेरो यांनी केले. अखिल भारतीय भिक्खू संघ आणि फुले-आंबेडकरी साहित्य संसद, यवतमाळ यांच्या वतीने गाडगेबाबा नगर, खापरी येथील त्रिरत्न बौद्ध विहारात महावंदना व धम्मदेसना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानावरून भदंत बुद्धघोष महाथेरो यांनी मार्गदर्शन केले. पुढे बोलताना ते म्हणाले, दानधर्म करताना चित्त प्रसन्न ठेवणे, मनाची एकाग्रता साधणे आणि विपश्यना व समाधी मार्गाचा अभ्यास करणे, ही कुशल जीवनाची लक्षणे आहेत. धम्म माणसाला जन्म-मरणाच्या फेऱ्यातून मुक्तीच्या दिशेने घेऊन जातो. त्यामुळे प्रत्येक उपासकाने धम्माचे आचरण करून आपले कुशल मंगल साधावे. भदंत ग्यानबोधी महाथेरो यांच्या हस्ते उद्घाटन झाले. फुले-आंबेडकरी साहित्य संसदेचे अध्यक्ष किशोर भगत यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी थायलंड, जपान आणि श्रीलंका येथील भन्तेजींनी धम्मदेसना केली. पारमिता, आर्य अष्टांगिक मार्ग आणि पंचशीलाचे महत्त्व विशद करून धम्माचरणाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाला थायलंड येथील भदंत मनीस झाईनो, भदंत सूरज थीराशेलो, भदंत धम्मदीपितो, भदंत सुमंगल सुधासो, भदंत नठेउथ भदरवरो, भदंत नागघोष महाथेरो, भदंत सारीपुत्त स्थवीर, भदंत राहुल थेरो, भदंत धम्मानंद थेरो, भदंत उपाली थेरो, भदंत अश्वजीत थेरो, भदंत पैय्यादीप, भदंत सिरीसारी पुत्त, भदंत बुद्धरत्न, भदंत शीलवंश, भदंत दिव्यानंद, भदंत शीलरतन थेरो, भदंत शीलघण, भदंत सुशीम, भदंत प्रग्यांदर्शी आणि भदंत डॉ. जीवक बोधी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी फुले-आंबेडकरी साहित्य संसद आणि त्रिरत्न बौद्ध विहार समितीच्या सदस्यांनी पुढाकार घेतला. किसन काळे यांनी सूत्रसंचालन तर महेंद्र वानखेडे यांनी आभार मानले.

## नवरतन जागर आदिशक्तीचा या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी यांच्या हस्ते उद्घाटन



हिंगोली : सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्या वतीने शहरातील शिवाजीराव देशमुख सभागृह येथे नवरतन जागर आदी शक्तीचा या गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दसरा समितीचे अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, मधुकर खंडागळे, सुरेश अप्पा सराफ, नीरज देशमुख, मिलिंद उबाळे, विशाल इंगोले यांच्यासह इतरांची उपस्थिती होती. नवरतन जागर आदीशक्तीचा या सांस्कृतिक गीतांच्या कार्यक्रम विविध प्रकारचे गीत सादर करण्यात आले. नवरतन जागर आदिशक्तीचा या कार्यक्रमाचे सादर करते दुर्गेश काळे आणि संच यांनी आपल्या भारदार आवाजाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करून सोडले होते

## योग्य नियोजनामुळे तणावमुक्त आयुष्य; न्या. चारुदत्त देशपांडे



यवतमाळ : वेळेचे योग्य नियोजन केल्यास तणावमुक्त आयुष्य जगता येते, असे विचार न्या. चारूदत्त देशपांडे यांनी व्यक्त केले. जिल्हा कौटुंबिक न्यायालयाच्या सहावा वर्धापन दिनानिमित्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांसाठी ताणतणाव मुक्त कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्षस्थानाहून जिल्हा कौटुंबिक न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश चारुदत्त देशपांडे बोलत होते.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पुनर्वसन मानसशास्त्र समुपदेशक पलक मेहता लाठीवाला ह्या होत्या. यावेळी न्या. देशपांडे पुढे म्हणाले, न्यायालयातील कामासाठी एकाग्रता, संयम, अचूकता खूप गरजेची असून न्यायालयीन कामकाजासोबत स्वतःच्या जबाबदाऱ्याही सांभाळाव्या लागतात. त्याचबरोबर जास्त वेळ बसून राहणे, वरिष्ठांच्या अपेक्षा, न्यायालयीन कामासाठी लोकांशी येणारा संपर्क यामुळे शारीरिक व मानसिक ताण निर्माण होतो. त्यामुळे वेळेचे योग्य नियोजन केल्यास व कुटुंबाला पुरेसा वेळ दिल्यास कार्यालयीन कामकाज व कुटुंबांमध्ये समतोल साधता येतो. प्रमुख पाहुणे पलक मेहता लाठीवाला यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## वातावरणातील बदलाचा आरोग्यावर परिणाम

यवतमाळ : गत काही दिवसांपासून पावसाने दीर्घ विश्रांती दिली आहे. यामुळे वातावरणात चांगलाच उकाडा निर्माण झाला आहे. हिवाळा सुरू होण्याऐवजी नागरिकांना उन्हाळ्याचा अनुभव येत आहे. तापमान ३५ अंशाच्या जवळपास गेले आहे. त्यामुळे दिवसा उन्हाचे चटके जाणवत आहे. या बदलत्या वातावरणामुळे ताप, अंगदुखी, सर्दी, खोकला यासारखे आजार अनेकांना जडले आहे. सध्या शासकीय व खासगी रुग्णालयांमध्ये रुग्णांची गर्दी दिसत आहे. अशा वातावरणामुळे मोठ्यांसोबतच लहान मुलांना देखील आजाराने ग्रासले आहे. ज्येष्ठ नागरिकांना दमाचा आजाराने अधिक त्रास होत असल्याचे दिसून येत आहे. पावसाने तब्बल दोन महिने दीर्घ विश्रांती घेतल्यामुळे वातावरणात गारवा राहीलेला नाही. त्यामुळे नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन वैद्यकीय तज्ज्ञांकडून केले जात आहे.

# चांदीच्या मातेच्या मूर्तीच्या प्रतिष्ठापनेने उद्या महाकाली महोत्सवाचा शुभारंभ

## एकवीरा माता मंदिरातून पालखी प्रस्थान; जैन मंदिर आणि आमदार किशोर जोरगेवार यांच्या राजमाता निवासस्थानावरून महाकाली मंदिरात होणार आगमन

*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी

**चंद्रपूर** : चंद्रपूरची आराध्य दैवत असलेल्या माता महाकालीच्या भक्तिमय वातावरणात उद्या, गुरुवारी श्री माता महाकाली महोत्सवाचा शुभारंभ होणार आहे. चांदीच्या मातेच्या मूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना आणि महाआरतीने महोत्सवाची सुरुवात होईल. यानिमित्त एकोरी वॉर्डातील एकवीरा माता मंदिरातून मातेच्या पालखीचे प्रस्थान होणार असून, जैन मंदिर आणि आमदार किशोर जोरगेवार यांच्या राजमाता निवासस्थानावरून मार्गक्रमण करत पालखी महाकाली मंदिरात पोहोचणार आहे.



गुरुवारी सकाळी एकवीरा माता मंदिरातून पालखी सोहळ्याला प्रारंभ होईल. त्यानंतर पालखी जैन मंदिरात जाईल. पुढे आमदार किशोर जोरगेवार यांच्या राजमाता निवासस्थानी पालखीचे आगमन होईल. तेथून पालखी माता महाकाली मंदिराकडे प्रस्थान करेल. मंदिरात चांदीच्या मातेच्या मूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात येणार असून, त्यानंतर महाआरती होईल. या धार्मिक सोहळ्यात भाविकांना सहभागी होता येणार आहे.

महाकाली महोत्सव हा चंद्रपूरच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग आहे. दरवर्षी हजारो भाविक माता महाकालीच्या दर्शनासाठी येतात. पालखी सोहळा, मूर्ती प्रतिष्ठापना आणि महाआरती या धार्मिक विधींमुळे महोत्सवाच्या प्रारंभाला विशेष महत्त्व प्राप्त होते.

**■ मातेच्या जयघोषाने शहरात भक्तिमय वातावरण**

चांदीच्या मातेच्या मूर्तीची प्रतिष्ठापना आणि महाआरती हे उद्याच्या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. श्रद्धा, भक्ती आणि परंपरेचा संगम असलेल्या या सोहळ्यामुळे चंद्रपूर शहरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार असून, महाकाली महोत्सवाच्या मंगलमय प्रारंभासाठी भाविकांमध्ये उत्सुकता आहे.

# दिवाळीच्या सुट्टीतही अभ्यास

## दसरी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना द्यावी लागणार पॅट चाचणी

*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी

**उमरखेड** : दिवाळीच्या सुटट्यात गावाला जाणे, नातेवाइकांच्या भेटीगाठी आणि खेळण्याचा आनंद लुटण्याच्या तयारीत असलेल्या विद्यार्थ्यांना यंदा सुट्ट्यातही अभ्यासाचेही नियोजन करावे लागणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आणि अनुदानित शाळांमधील इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची नियतकालिक अध्ययन प्रगती चाचणी (पॅट) नोव्हेंबर अखेरीस होणार असल्याने दिवाळीनंतर लगेचच विद्यार्थ्यांना चाचणीला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.



विद्यार्थ्यांना शिकविलेल्या अभ्यासक्रमाचे आकलन कितपत झाले, कोणत्या विषयांमध्ये त्यांची प्रगती समाधानकारक आहे आणि कुठे अधिक सरावाची गरज आहे, हे जाणून घेण्यासाठी पॅट चाचणी घेतली जाते. या चाचणीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील अडचणी ओळखून त्यांना आवश्यक मार्गदर्शन करण्यावर भर दिला जातो. प्रथम सत्रातील अध्ययन प्रगती चाचणी दिवाळीनंतर होणार असल्याने यंदा परीक्षेच्या नियोजनात बदल झाला आहे. सुट्टीनंतर अध्यापनाचे नियोजन, अभ्यासक्रमाची उजळणी आणि चाचणीची तयारी यासाठी शिक्षकांना वेळ द्यावा लागणार आहे. त्यामुळे द्वितीय सत्राच्या सुरुवातीलाच शाळांमध्ये शैक्षणिक कामांची लगबग वाढण्याची शक्यता आहे. पॅट चाचणीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे मूल्यमापन करून त्यांच्या अध्ययनातील उणिवा दूर करणे हा आहे. चाचणीत कमी गुण मिळाल्यास विद्यार्थ्यांना अधिक सराव आणि मार्गदर्शनाची गरज ओळखता येते. या गुणांच्या आधारे शिक्षकांवर कारवाई केली जाणार नसल्याची भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे.

दिवाळीचा आनंद घेताना विद्यार्थ्यांनी दररोज थोडा वेळ अभ्यासासाठी राखून ठेवणे आवश्यक आहे. शिकविलेल्या धड्यांची उजळणी, गणिताचा सराव आणि न समजलेल्या प्रश्नांचे निराकरण केल्यास चाचणीचा ताण कमी होऊ शकतो. त्यामुळे सुट्टीचा आनंद आणि अभ्यास यांचा समतोल साधण्याचे आव्हान विद्यार्थ्यांसमोर असणार आहे.

# गुंज येथे नवरात्रोत्सवात भाविकांची मांदियाळी

*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी

**महागाव** : तालुक्यातील गुंज येथील माता पायरिका देवी संस्थान हे विदर्भातील भाविकांसाठी श्रद्धेचे महत्त्वपूर्ण स्थान बनले आहे. माहूर गडावरील रेणुका देवीच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी माता पायरिका देवी ही माहूर गडाची पहिली पायरी असल्याची आख्यायिका प्रचलित आहे. त्यामुळे पुसद-माहूर मार्गावरून प्रवास करणारे असंख्य भाविक या मंदिरात दर्शनासाठी तसेच काही वेळ विश्रांतीसाठी आवर्जून थांबतात. गुंज येथील माता पायरिका देवीचे मंदिर उंच टेकडीवर निसर्गरम्य परिसरात वसलेले आहे. मंदिरातील प्रसन्न वातावरण, देवीची आकर्षक सजावट आणि परिसरातील नैसर्गिक सौंदर्य यामुळे भाविकांना आध्यात्मिक समाधान मिळते. महाराष्ट्राच्या विविध भागांतून माहूर गडावर जाणारे भाविक या संस्थानाला भेट देत असल्याने या ठिकाणाला धार्मिकदृष्ट्या विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे लोकवर्गणी आणि लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने संस्थान परिसरात प्रशस्त सभागृह उभारण्यात आले असून, भाविकांसाठी पिण्याचे पाणी आणि स्वच्छतागृहांचीही उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. या सुविधांमुळे प्रवासी भाविकांना मोठा दिलासा मिळतो. विशेष म्हणजे, संस्थान परिसरात गोरगरीब कुटुंबांचे विवाह सोहळेही मोठ्या प्रमाणावर पार पडतात. त्यामुळे हे संस्थान धार्मिक कार्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपणारे केंद्र म्हणूनही ओळखले जाते. नवरात्रोत्सवाच्या काळात माता पायरिका देवी संस्थानात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण होते. देवीच्या दर्शनासाठी गुंजसह परिसरातील अनेक गावांमधून भाविक मोठ्या संख्येने येतात. दररोज सकाळी सात वाजता आणि सायंकाळी सात वाजता देवीची आरती केली जाते. या आरतीसाठी महिला आणि पुरुष भाविकांची मोठी उपस्थिती असते. नवरात्रोत्सवातील नवमीच्या दिवशी देवीच्या भंडाऱ्याचे आयोजन करून भाविकांना महाप्रसादाचे वाटप केले जाते. या धार्मिक सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी गावकरी मोठ्या उत्साहाने सहकार्य करतात. माता पायरिका देवी संस्थानाच्या विविध धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांच्या यशस्वी आयोजनामध्ये विश्वस्त मंडळाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

### भाविकांसाठी आस्थेचे स्थान

भाविकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे, धार्मिक परंपरा जपणे आणि सामाजिक उपक्रमांना प्रोत्साहन देणे, या माध्यमातून संस्थान परिसरात श्रद्धा आणि सामाजिक एकोपा वृद्धिंगत होत आहे. श्रद्धा, सेवा आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम असलेले गुंज येथील माता पायरिका देवी संस्थान हे माहूर गडाकडे जाणाऱ्या भाविकांसाठी आस्थेचे स्थान ठरत आहे.



# काढणी यंत्रासह मजूर मिळणे कठीण

*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी

**यवतमाळ** : सोयाबीनचे पीक जोमात असताना पावसाने विश्रांती घेतली. सोयाबीनच्या उत्पादनात प्रचंड घट आली असून मजुरासह काढणी यंत्र मिळत नसल्याने अस्मानी संकटाशी झुंजणाऱ्या शेतकऱ्यांसमोर नवे संकट निर्माण झाले असून आहे ते पीक हातातून जाण्याची भीती निर्माण झाली आहे. यावर्षी अल निनोच्या प्रभावामुळे दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. दिवसभर उन्हाची तीव्रता पाहता ऐन ऑक्टोबर महिन्यात हिवाळ्याने सुट्टी घेतली की काय? अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ज्या शेतकऱ्यांकडे पाण्याची उपलब्धता होती त्यांनी सिंचन करून जोपासण्याचा प्रयत्न केला असला तरी वातावरणातील उष्णतेमुळे पाहिजे त्या प्रमाणात सोयाबीन उत्पन्न होत नाही. सोयाबीन काढणीसाठी मजूर मिळत नाही मिळालेले मजूर अव्वाच्या सव्वा दराने ठेके घेत आहेत. एक एकर सोयाबीन कापणीसाठी साडेतीन ते चार हजार रुपये मजूरी द्यावी लागत असून मजुरांना शेतात आणण्यासाठी एक ते दोन हजार रुपये ऑटोचे भाडे द्यावे लागत आहे. अशाही परिस्थितीत सोयाबीन कापून त्याचा ढीग लावल्यानंतर काढणी यंत्र मिळणे दुरापास्त झाले आहे. तालुक्यातील मोठ्या प्रमाणात सोयाबीन काढणी यंत्र आहे. परंतु, तालुक्यातील मजूरवर्ग हा ऊस तोडणीसाठी गेल्यामुळे कापणी यंत्रावर मजूर भेटत नाही. त्यामुळे अनेक कापणी यंत्र उभे आहेत. ज्यांचे कापणी यंत्र आहेत ते सुद्धा प्रती क्विंटल तीनशे ते चारशे रुपये भाव मागत आहे.

## संक्षिप्त....

### एव्हीबीआरएचमध्ये पहिल्यांदाच रोबोटच्या मदतीने यशस्वी गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया



वर्धा : आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयाने (एव्हीबीआरएच), सावंगी (मेघे) येथे आधुनिक वैद्यकीय उपचार क्षेत्रात महत्त्वाचे यश मिळवले आहे. रुग्णालयात प्रथमच रोबोटच्या मदतीने संपूर्ण गुडघा प्रत्यारोपणाची (टोटल नी रिप्लेसमेंट) शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली.ही शस्त्रक्रिया ऑर्थोपेडिक विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. गजानन पिसुळकर यांनी प्रा. डॉ. सुहास लांडगे आणि वैद्यकीय टीमच्या सहकार्याने केली. या यशामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना आधुनिक वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांना बळ मिळणार आहे.रोबोटच्या मदतीने गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया कशी केली जाते, याची माहिती देण्यासाठी ऑर्थोपेडिक विभागाने यापूर्वी शैक्षणिक कार्यशाळांचे आयोजन केले होते. या उपक्रमाला पुढे नेत, रुग्णालयात सात दिवसांसाठी पूर्णपणे स्वयंचलित रोबोटिक प्रणाली उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे डॉक्टरांना या तंत्रज्ञानाचा वापर प्रत्यक्ष रुग्णांवरील उपचारांसाठी करता आला आला. विशेष म्हणजे, रोबोटच्या मदतीने रण्यात आलेली पहिली गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया रुग्णासाठी पूर्णपणे मोफत करण्यात आली.

रोबोटच्या मदतीने करण्यात येणाऱ्या संपूर्ण गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रियेमुळे शस्त्रक्रियेचे अधिक चांगले नियोजन करता येते. तसेच हाडांची योग्य रचना करणे, गुडघ्याचा योग्य समतोल राखणे आणि प्रत्यारोपण योग्य जागी बसवणे अधिक अचूकपणे शक्य होते. एव्हीबीआरएच मध्ये हे तंत्रज्ञान उपलब्ध झाल्यामुळे पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या डॉक्टरांना आणि तरुण ऑर्थोपेडिक तज्ज्ञांना रोबोटच्या मदतीने शस्त्रक्रिया करण्याचे तंत्र शिकण्याची संधी मिळणार आहे. गुडघा प्रत्यारोपणाच्या आधुनिक शस्त्रक्रियांमध्ये या तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. ऑर्थोपेडिक विभागाने ही शस्त्रक्रिया यशस्वी करण्यासाठी सातत्याने सहकार्य आणि प्रोत्साहन दिल्याबद्दल एआयएचईआर (डीयू) चे व्हाईस चान्सलर डॉ.ललितभूषण वाघमारे,कुलसचिव डॉ.श्वेता काळे (पिसुळकर),चीफ ऑपरेटिंग ऑफिसर डॉ. निलेश अग्रवाल, जेएनएमसीच्या डीन डॉ. सोनाली चौधरी आणि रुग्णालयाचे डायरेक्टर डॉ. चंद्रशेखर महाकाळकर यांचे मनःपूर्वक आभार मानले. सावंगी (मेघे) येथे रोबोटच्या मदतीने पहिली गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी होणे ही एव्हीबीआरएच साठी महत्त्वाची उपलब्धी आहे. यामुळे मध्य भारतातील ग्रामीण भागातील रुग्णांना आधुनिक ऑर्थोपेडिक उपचार आणि प्रगत शस्त्रक्रिया तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्याच्या रुग्णालयाच्या प्रयत्नांना अधिक बळ मिळणार आहे. तसेच, वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि तरुण डॉक्टरांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे.

### कोठारी येथे चारा साक्षरता अभियान



हिंगोली : दुष्काळी परिस्थितीत जनावरांसाठी चाऱ्याचे योग्य नियोजन करण्यासह निकृष्ट चारा सकस करून जनावरांना खाऊ घालण्याबाबत पशुपालकांमध्ये जनजागृती करण्यासाठी वसमत तालुक्यातील मौजे कोठारी येथे चारा साक्षरता अभियानांतर्गत मार्गदर्शन व प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. या उपक्रमात गावातील ४५ पशुपालकांनी सहभाग घेतला. या वेळी सोयाबीनच्या कुटारावर युरिया प्रक्रिया करून तो अधिक पौष्टिक व सकस बनविण्याची पद्धत प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगण्यात आली. दुष्काळी परिस्थितीत उपलब्ध चाऱ्याचा योग्य वापर करून जनावरांना पोषक आहार उपलब्ध करून देण्याबाबत पशुपालकांना मार्गदर्शन करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय, हिंगोली तसेच तालुका पशुसंवर्धन अधिकारी, वसमत यांच्या सूचनेनुसार तालुक्यातील प्रत्येक गावात चारा साक्षरता अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत पशुपालकांना चारा व्यवस्थापन, निकृष्ट चाऱ्याचे सकस चाऱ्यात रूपांतर आणि दुष्काळी परिस्थितीत जनावरांची काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन केले जात आहे. या वेळी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सिद्धार्थ इंगोले यांनी पशुपालकांना मार्गदर्शन केले.

### घटस्थापनेपासून विजयादशमीपर्यंत घाटंजीत श्री दुर्गामाता दौडीचा जागर

घाटंजी : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या शौर्याचा, त्यागाचा आणि राष्ट्रनिष्ठेचा आदर्श समाजासमोर ठेवत घटस्थापनेपासून विजयादशमीपर्यंत श्री दुर्गामाता दौडीचे आयोजन करण्यात येत आहे. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, विभाग घाटंजी यांच्या वतीने शहरातील विविध भागांत दररोज ही दौड काढण्यात येत आहे. जगदंबा तुळजाभवानी मातेची कृपा आणि राष्ट्रमाता राजमाता जिजाऊसाहेबांचे संस्कार हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याचे प्रेरणास्थान होते. छत्रपती शिवरायांचे महान कार्य समजून घेण्यासाठी राजमाता जिजाऊसाहेबांचे संस्कार, त्यांचे विचार आणि स्वराज्यनिष्ठा समजून घेणे आवश्यक आहे. आई दुर्गामातेने अष्टभुजांनी शस्त्रे धारण करून अधर्माचा नाश केल्याची प्रेरणा घेत, आजच्या युवक-युवतींमध्ये धैर्य, आत्मविश्वास, संस्कार आणि स्वसंरक्षणाची जाणीव निर्माण व्हावी, हा या दौडीमागील महत्त्वाचा उद्देश आहे. तसेच महिलांनी आपल्या सुरक्षिततेबाबत जागरूक राहावे, चारित्र्य व स्वाभिमान जपावा आणि लव्ह जिहादसारख्या प्रकारांबाबत जागरूक राहून कोणत्याही दबावाला किंवा फसवणुकीला बळी पडू नये, असा संदेश या उपक्रमातून देण्यात येत आहे. भगव्या ध्वजाच्या साक्षीने, देव, देश आणि धर्म यांविषयीची निष्ठा मनामनांत जागृत करण्यासाठी ही दौड आयोजित केली जाते. छत्रपती शिवाजी महाराजांनी पाहिलेले हिंदवी स्वराज्याचे स्वप्न, त्यांचे विचार आणि आदर्श पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, तसेच समाजात शिस्त, एकजूट, राष्ट्रभक्ती आणि धर्माभिमानाची भावना दृढ करणे, हे या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

# उमरी (काप) मध्ये भ्रष्टाचाराचा कळस!

## बोगस बांधकामे, अस्तित्वात नसलेल्या मशीनची खरेदी, 7 लाखांचा घोटाळा उघड
## ज्या अधिकाऱ्याच्या नाकाखाली घोटाळा झाला त्याच्याकडेच चौकशी

*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी
बबिता शिवणकर




आर्णी : आर्णी तालुक्यातील उमरी (काप) ग्रामपंचायतीत मोठा आर्थिक घोटाळा झाल्याची धक्कादायक तक्रार समोर आली आहे. ग्रामपंचायतीच्या 3 सदस्यांनी आणि समस्त ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी, आर्णी यांच्याकडे लेखी तक्रार देऊन ग्रामसेवक, सरपंच आणि उपसरपंच यांनी संगनमत करून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप केला आहे. तक्रारीत नमूद केलेले गैरप्रकार पाहून अधिकारीही चक्रावले आहेत.

तक्रारीत काय आहे - 7 गंभीर आरोप :
१) बोगस पाणी पुरवठा बांधकाम - १,६६,६४४ रु.
२) अस्तित्वात नसलेली फॉग मशीन खरेदी दाखवून - ६९,९५० रु. लाटले.
३) स्मशानभूमीचे लोखंडी अँगल बेकायदेशीर विक्री केले.
४) नाली सफाईच्या नावावर ८६,००० आणि ७०,००० रुपयांचे बोगस व्यवहार.
५) स्ट्रीट लाईट मध्ये २९,००० रुपयांचे जादा बिल.
६) सोलर स्टार्टर मध्ये ६३,००० रुपयांचा अपहार.
७) मुतारी दुरुस्तीत ५३,००० रुपयांचे जादा बिल.

अशा एकूण ७ पेक्षा जास्त बाबतीत 5 ते 6 लाख रुपयांपेक्षा जास्त रकमेचा अपहार झाल्याचा आरोप तक्रारदार ग्रा.पं. सदस्य मनोज मेश्राम, वैशाली वानखडे, वनमाला धुर्वे आणि समस्त ग्रामस्थांनी केला आहे.

**चौकशी अधिकाऱ्यावरच गंभीर आरोप**

या प्रकरणाची चौकशी पंचायत विस्तार अधिकारी श्री. इंगोले, पंचायत समिती आर्णी यांच्याकडे सोपवण्यात आली होती. मात्र यावरच ग्रामस्थांनी आक्षेप घेतला आहे. तक्रारदारांचे म्हणणे आहे की, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ नुसार ग्रामसेवक, सरपंच यांच्या दैनंदिन कामकाजावर, आर्थिक व्यवहारावर आणि हजेरीवर नियंत्रण ठेवण्याची थेट जबाबदारी विस्तार अधिकारी (पंचायत) यांची आहे. मागील तीन वर्षात एवढा मोठा भ्रष्टाचार होत असताना संबंधित पंचायत विस्तार अधिकाऱ्याने एकदाही आक्षेप नोंदवला नाही, ही बाबच संशयास्पद आहे.

ज्या अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली हा भ्रष्टाचार झाला, तोच अधिकारी चौकशी करणार असेल तर ती चौकशी निष्पक्ष होणार नाही. संबंधित अधिकारी ग्रामपंचायत सरपंच आणि सचिवाला संरक्षण देत असल्याची चर्चा गावात असून त्यांच्याकडून न्याय मिळेल यावर आमचा विश्वास नाही, असे तक्रारीत म्हटले आहे.

**ग्रामस्थांच्या 3 प्रमुख मागण्या :**

१) विस्तार अधिकारी श्री इंगोले यांची चौकशी समिती मधून हकालपट्टी करून दुसऱ्या सक्षम व निरपेक्ष अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी
२) चौकशी होईपर्यंत ग्रामपंचायतीचे सर्व दप्तर, बँक खाते व चेकबुक सील करावे जेणेकरून पुराव्याशी छेडछाड होणार नाही.
३) चौकशी समितीसमोर आम्हाला आमचे म्हणणे मांडण्याची व पुरावे सादर करण्याची संधी द्यावी.

या तक्रारीमुळे आर्णी पंचायत समितीत खळबळ उडाली असून गटविकास अधिकारी या प्रकरणात काय निर्णय घेतात, याकडे संपूर्ण सावळी सर्कलचे लक्ष लागले आहे.

# आर्णी यूथ डेव्हलपमेंट फाउंडेशनचा किशोरी आरोग्य जनजागृतीसाठी पुढाकार

## 'Hormones, Hygiene & Harmony' उपक्रमांतर्गत सहा शैक्षणिक संस्थांमध्ये जनजागृती कार्यशाळा

*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी
बबिता शिवणकर

आर्णी : किशोरवयीन मुलींमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण व्हावी, मासिक पाळीविषयीचे गैरसमज दूर व्हावेत आणि मुलींना त्यांच्या शारीरिक व मानसिक बदलांविषयी शास्त्रीय माहिती मिळावी, या उद्देशाने आर्णी यूथ डेव्हलपमेंट फाउंडेशन (AYDF) च्या वतीने 'Hormones, Hygiene & Harmony' हा किशोरी आरोग्य जनजागृती उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत ३० सप्टेंबर ते १० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत एकूण सहा शैक्षणिक संस्थांमध्ये आरोग्यविषयक मार्गदर्शन सत्रे आयोजित करण्यात आली. या सत्रांमध्ये तज्ज्ञ महिला डॉक्टरांनी विद्यार्थिनींना किशोरावस्थेतील शारीरिक, संप्रेरक व भावनिक बदल, मासिक पाळीतील स्वच्छता, PCOS/PCOD विषयी जागरूकता आणि आरोग्यदायी जीवनशैली याबाबत मार्गदर्शन केले.

सहा शैक्षणिक संस्थांमध्ये जनजागृती उपक्रम
१. कै. राजकमलजी भारती कला व वाणिज्य महाविद्यालय — दिनांक ३० सप्टेंबर २०२६; मार्गदर्शक : डॉ. अंकिता अलिझार
२. आशीष आळणे सर कोचिंग क्लासेस — दिनांक ३० सप्टेंबर २०२६; मार्गदर्शक : डॉ. स्वाती शिंदे.
३. सनराईज नर्सरी अँड कॉन्व्हेंट — दिनांक ३० सप्टेंबर २०२६; मार्गदर्शक : डॉ. सोनाली गंभीर आणि डॉ.अंकिता जैन.
४. श्री.म.द.भारती (मुख्य शाखा),आर्णी — दिनांक ३ ऑक्टोबर २०२६; मार्गदर्शक : डॉ. अंकिता अलिझार.
५. श्री.म.द.भारती ज्युनिअर कॉलेज,आर्णी — दिनांक ६ ऑक्टोबर २०२६; मार्गदर्शक : डॉ. स्वाती शिंदे.
६. गुरुदेव विद्या मंदिर,जवळा — दिनांक १० ऑक्टोबर २०२६; मार्गदर्शक : डॉ. तेजश्री चिंतावार.

या उपक्रमात एकूण सहा शैक्षणिक संस्थांचा समावेश असून, सहा वेगवेगळ्या तज्ज्ञ मार्गदर्शकांनी या जनजागृती मोहिमेत सहभाग नोंदविला. आरोग्य, स्वच्छता आणि सकारात्मक दृष्टिकोनावर भर कार्यशाळांमध्ये मासिक पाळीचे शास्त्रीय ज्ञान, वैयक्तिक स्वच्छता, सॅनिटरी उत्पादनांचा सुरक्षित वापर व पर्यावरणपूरक विल्हेवाट, लोहयुक्त व संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि आरोग्यदायी जीवनशैली यांचे महत्त्व विद्यार्थिनींना समजावून सांगण्यात आले.

तसेच PCOS/PCOD या आरोग्यविषयक स्थितींबाबत जागरूकता, संभाव्य लक्षणे ओळखणे, स्वतःहून निदान न करता पात्र वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घेणे आणि आवश्यकतेनुसार वैद्यकीय तपासणी करून घेणे यावर भर देण्यात आला. शारीरिक बदलांविषयी मनात असलेला संकोच दूर करणे, शरीराविषयी सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे, सोशल मीडियावरील दिशाभूल करणाऱ्या आरोग्यविषयक माहितीपासून सावध राहणे आणि आत्मविश्वासाने प्रश्न विचारण्याची सवय निर्माण करणे, हेदेखील या उपक्रमाचे महत्त्वाचे उद्दिष्ट होते.

किशोरवय हा मुलींच्या शारीरिक आणि मानसिक विकासातील महत्त्वाचा टप्पा आहे. या काळात योग्य माहिती, समुपदेशन आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन मिळाल्यास मुलींमध्ये आत्मविश्वास वाढण्यास आणि आरोग्याबाबत योग्य निर्णय घेण्यास मदत होते. याच उद्देशाने आर्णी यूथ डेव्हलपमेंट फाउंडेशनने शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून हा जनजागृती उपक्रम राबविला. "शरीराला जाणून घ्या, आरोग्याचा आदर करा. स्वच्छता पाळा, अपप्रचारास प्रश्न विचारा आणि योग्य वैद्यकीय मदत घेण्यास संकोच करू नका," हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

किशोरवयीन मुलींना आरोग्यविषयक योग्य माहिती मिळावी, मासिक पाळीविषयीचे गैरसमज दूर व्हावेत आणि आरोग्याबाबत मोकळेपणाने संवाद साधण्याचे वातावरण निर्माण व्हावे, यासाठी फाउंडेशनचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

आयोजकः-आर्णी यूथ डेव्हलपमेंट फाउंडेशन (AYDF)
सही लोग • सही सोच • सामूहिक प्रयास

### बीएसएनएलची कॉपर केबल चोरीला

*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी

यवतमाळ : शहरातील वसंतराव नाईक चौक ते पंजाचौक मार्गावरील बीएसएनएलची भूमिगत कॉपर केबल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या केबलची एकूण किंमत २ लाख ७४ हजार २३७ रुपये असून, याप्रकरणी यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बीएसएनएलच्या भूमिगत केबलची २७ सप्टेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास पाहणी केली असता केबल चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. यामध्ये १२०० पेअरची २५० मीटर केबल, किंमत २ लाख ५ हजार ५९० रुपये आणि ४०० पेअरची २५० मीटर केबल, किंमत ६८ हजार ६४७ रुपये, असा एकूण मुद्देमाल चोरीला गेला. चोरी झालेल्या केबलमधील तांब्याचे एकूण वजन सुमारे १ हजार ११५ किलो आहे. याप्रकरणी बीएसएनएल क्वार्टर, यवतमाळ येथील अमित कुमार मन्यू ठाकूर यांनी १३ ऑक्टोबर रोजी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

# राजकीय जीवन उद्ध्वस्त करण्याचा डाव?

*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी



यवतमाळ : राजकारणात विरोधकांना नामोहरम करण्यासाठी आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जातात. मात्र, काँग्रेसचे नगरसेवक तथा प्रदेश सचिव जावेद अन्सारी यांचे राजकीय जीवनच उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न काही राजकीय नेत्यांकडून होत आहे. नगरसेवक जावेद अन्सारी यांचे 'राजकीय जीवन उद्ध्वस्त करण्याचा डाव' या चर्चेने राजकीय वातावरण तापत असून, यामुळे एकनिष्ठ पदाधिकाऱ्यांची गोची होत आहे.

राजकीय क्षेत्रात एखाद्या कार्यकर्त्यांची वाढती लोकप्रियता, जनसंपर्क आणि संघटनात्मक ताकद काही राजकीय विरोधकांसाठी अस्वस्थतेचे कारण ठरू शकते. अशा परिस्थितीत जावेद अन्सारी यांच्यावर काही आरोप सुद्धा करण्यात आले होते. या आरोपातून त्यांचे राजकारणातील प्रतिमेला धक्का बसविण्याचा डाव असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात येत असून, माझ्यावर खोटे आरोप करण्यात आले असून, मला संविधानावरपूर्ण विश्वास असून, मी यातून न्याय मिळेल अशी अपेक्षा जावेद अन्सारी यांनी व्यक्त केली.

# राजगृहावर "युगमाता रमाई पाळणा" पुस्तकाचे प्रकाशन

*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी
:बबिता शिवणकर



आर्णी : रविवार दि.११ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता राजगृह - दादर मुंबई येथे युगमाता रमाई पाळणा या पुस्तकाचे प्रकाशन मा.डॉ.भीमराव यशवंतराव आंबेडकर (राष्ट्रीय कार्याध्यक्ष, भारतीय बौद्ध महासभा) यांच्या हस्ते संपन्न झाले आहे. पाळणाकार डॉ.सागर जाधव यांच्या इच्छेनुसार, राजगृहाच्या ज्या पायरीवर बसून युगमाता रमाई रात्रंदिवस डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची उपाशीपोटी वाट बघत असत, त्या पायरीवर पाळण्याची एक प्रत ठेवून देखिल प्रकाशन करण्यात आले आहे.

डॉ.सागर जाधव लिखित या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याला जेष्ठ साहित्यिक, कवी, विचारवंत मा.ज.वि. पवार हे प्रकृती बरी नसताना देखील उपस्थित होते. याप्रसंगी ऍड.संघराज रुपवते यांनी आवर्जून उपस्थित राहून समयोचित मार्गदर्शन केले. याप्रसंगी आयुष्यमती पुष्पलता धाकतोडे यांनी पाळणाकर डॉ.सागर जाधव आणि प्रणया सागर जाधव यांचा शॉल देऊन सत्कार केला. या कार्यक्रमाला न्यायमूर्ती डॉ.यशवंत चावरे, डॉ.आनंद नरंगलकर, आयु.पुष्पलता धाकतोडे, डॉ.आशालता कांबळे, ऍड.अक्षय डिंगळे, आनंद चक्रनारायण, गौतम संगोळे, प्रकाशिका प्रणया सागर जाधव, प्रा.अशोक जाधव, रवी बागेसर, आलोक जाधव, संबोधी जाधव, प्रकाश काळे, रोहिणी यशवंते, धम्मराज यशवंते, राजगृहावरील सर्व समता सैनिक दलाचे सैनिक आणि उपासक-उपसिका उपस्थित होते.

**महाकवी वामनदादा कर्डक :** समग्र वाङ्मयाचे संपादक डॉ.सागर जाधवांनी हा पाळणा लिहिला असून या पुस्तकाच्या मलपृष्ठावर जेष्ठ विचारवंत डॉ.यशवंत मनोहर यांनी शुभेच्छापर लिहिले आहे की, "कवी सागर जाधव यांनी लिहिलेला युगमाता रमाई हा पाळणा, रमाईच्या डोंगरापेक्षा मोठ्या कष्टांची आणि गगनभेदी निष्ठांची विजयी गोष्ट येणाऱ्या सर्वच पिढ्यांना सांगत राहणार आहे. ही सूर्याच्या जळत्या माथ्यावर सावली झालेल्या चांदण्याचीच गोष्ट आहे. रमाईला दुनिया आता मृत्यूवर मात करणारे करुणेचे महाकाव्य मानते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर निर्माण करणारी रमाई नावाची अभेद्य निर्धाराची प्रयोगशाळा मुलामुलींच्या संस्कारात पोहचविण्याची गरज आहे. या पाळण्यामुळे माता-भगिनींची ही भावनिक आणि वैचारिक गरज उत्तम पद्धतीने पूर्ण होत आहे."

एकूण बासष्ठ पृष्ठांचे हे पुस्तक असून चाळीस कडव्यांच्या पाळण्यातून युगमाता रमाईच्या जीवनकार्याचा काव्यमय आढावा पाळणाकाराने यशस्वीपणे घेतला असून सोबतच डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि युगमाता रमाईंचा पत्रव्यवहार, तसेच राजगृह आणि रमाईंचे माहेर वनंदगाव येथील छायाचित्रे देखिल समाविष्ट केलेली आहेत.

आलोक-संबोधी प्रकाशन यवतमाळच्या प्रकाशिका प्रणया सागर जाधव यांनी हे पुस्तक प्रकाशित केले असून, मुखपृष्ठ मांडणी-सजावट प्रा. अशोक जाधव, मुखपृष्ठ डिझाईन निलंबर लोखंडे यांनी तर प्रिंटिंगचे काम वैभव ऑफसेट, नागपूर यांनी केले आहे.

# प्रा.वसंत हंकारे यांच्या व्याख्यानाने महागावकर मंत्रमुग्ध

*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी




महागाव : ज्या आई-वडिलांनी स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवून मुलांच्या स्वप्नांना बळ दिले, आयुष्यभर कष्ट करून मुलांना घडविले, त्याच आई-वडिलांना वृद्धापकाळात प्रेम, आधार आणि सन्मान देणे हे प्रत्येक मुलाचे कर्तव्य आहे. हाच हृदयस्पर्शी संदेश समाजप्रबोधनकार तथा प्रसिद्ध व्याख्याते प्रा. वसंत हंकारे (सांगली) यांनी आपल्या ओघवत्या वाणीमधून दिला.

त्यांच्या 'आई-बाप समजून घेताना' या विषयावरील व्याख्यानाने महागाव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे पटांगण भावनिक वातावरणाने भारावून गेले. अनेक विद्यार्थी, पालक आणि उपस्थितांना अश्रू अनावर झाले, तर दोन तासांच्या या प्रबोधनाने उपस्थितांना आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडले. शनिवार, १० ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता महागाव तालुका पत्रकार महासंघ आणि नगरसेविका सौ. जयश्री संजय नरवाडे यांच्या संयुक्त आयोजनातून हा विशेष व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडला.

महागाव परिसरातील विविध शाळांमधील विद्यार्थी-विद्यार्थिनी, पालक, शिक्षक, पत्रकार आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घेतला. आई-वडिलांच्या त्यागाची जाणीव; विद्यार्थ्यांचे डोळे पाणावले! आई-वडील आपल्या मुलांच्या भविष्यासाठी स्वतःच्या सुखाचा त्याग करतात. मुलांना चांगले शिक्षण मिळावे, त्यांनी आयुष्यात मोठे व्हावे आणि त्यांच्या वाट्याला चांगले दिवस यावेत, यासाठी ते आयुष्यभर धडपडत असतात. मात्र, यशाच्या शिखरावर पोहोचल्यानंतर अनेकदा मुलांना आपल्या पालकांच्या त्यागाचा विसर पडतो. या वास्तवावर भाष्य करत प्रा. हंकारे यांनी आई-वडिलांचे महत्त्व प्रभावी शब्दांत पटवून दिले.आई-वडील जिवंत असतानाच त्यांची काळजी घ्या, त्यांना प्रेम द्या आणि सन्मानाने जगू द्या. त्यांच्या पश्चात केलेल्या मोठ्या विधींपेक्षा ते हयात असताना दिलेला आधार, प्रेमाचे दोन शब्द आणि त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद अधिक महत्त्वाचा आहे, हा विचार व्याख्यानातून अधोरेखित झाला. व्याख्यानातील भावनिक प्रसंगांनी विद्यार्थी-विद्यार्थिनींसह पालकांनाही अंतर्मुख केले.

अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव करून देणाऱ्या या प्रबोधनाने उपस्थितांच्या मनाला खोलवर स्पर्श केला. यशस्वी व्हा; पण संस्कारांची शिदोरी विसरू नका! आजच्या स्पर्धेच्या युगात मोठे होण्याची स्वप्ने पाहणाऱ्या नवीन पिढीने केवळ पैसा, प्रतिष्ठा आणि पद यांच्यामागे न धावता माणुसकी, संस्कार आणि कुटुंबातील नात्यांची जपणूक करावी, असा महत्त्वपूर्ण संदेश या व्याख्यानातून देण्यात आला. आई-वडिलांचा आदर करणे, त्यांच्या अनुभवाचा सन्मान राखणे आणि त्यांच्या अडचणी समजून घेणे, हीच खऱ्या अर्थाने प्रगतीची पायरी आहे. विद्यार्थ्यांनी वाईट संगत, व्यसनाधीनता आणि चुकीच्या मार्गापासून दूर राहून शिक्षण, शिस्त, मेहनत आणि चांगल्या विचारांच्या बळावर आपले भविष्य घडवावे. मोबाईल आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरासोबतच प्रत्यक्ष संवाद, कौटुंबिक जिव्हाळा आणि सामाजिक जबाबदारी यांनाही महत्त्व द्यावे, असा आशय या प्रबोधनातून अधोरेखित झाला. 'मोठे होणे म्हणजे केवळ यश मिळविणे नव्हे, तर ज्यांनी आपल्याला घडविले त्यांना अभिमानाने जगविणे होय,' हा विचार या कार्यक्रमातून उपस्थितांच्या मनावर ठसला.

# शेतकऱ्यांनो, पीक कर्ज देण्यास बँका नकार देत असेल तर जिल्हा प्रशासनाला कळवा

## जिल्हाधिकारी विकास मीना यांचे आवाहन



*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी

यवतमाळ : राज्य शासनाने जिल्ह्यातील सर्व तालुक्यात दुष्काळ (ट्रिगर १) जाहीर केला असून या तालुक्यांमध्ये विशेष सवलती लागू करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये जमीन महसुलात सुट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेती विषयक कर्ज वसुलीस स्थगिती इत्यादी सवलती लागू आहेत. शासन निर्णयानुसार खरीप हंगामात दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांनी घेतलेल्या अल्प मुदतीच्या पीककर्जाचे मध्यम मुदत पीककर्जात पुनर्गठन करण्यास मान्यता दिली आहे. तसेच शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने बँकांनी खरीप पीक कर्जाच्या पुनर्गठनाची कार्यवाही करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. या शासन निर्णयानुसार शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्यास बँका नकार देत असेल तर याबाबत तत्काळ जिल्हा प्रशासनाला कळविण्याचे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले आहे.